POSTAL REGISTRATION : PLG/255/2023-2025

RNI NO:- MAHMAR/2021/81614

मराठी दैनिक

# मराठी एकीकरण बातमीपत्र

मराठी मायबोलीचा अभिमान जोपासणारे एकमेव पत्र

○संपादक : डॉ. श्री. दिपक मोरेश्वर नाईक

○उप संपादिका : .सौ. प्रीती दिपक नाईक ○कार्यकारी संपादक : श्री. विनोद दशरथ मेढे

● वर्ष -०५ ● अंक-१३३ ● मुंबई, सोमवार, १५ डिसेंबर २०२५ ● पृष्ठ-८ ● मूल्य-५ रु.

MARATHI EKIKARAN BATMIPATRA

## पालकांचे टेन्शन वाढवणारी बातमी! मुंबईतून मुलं होतायेत बेपत्ता

# ३६ दिवसात ८२ मुलं रहस्यमयरित्या गायब

**हरवलेल्या मुलाची तक्रार कुठे करावी?**

- मुंबई पोलिस नियंत्रण कक्षः १०० आणि ११२ वर कॉल करा
- चाइल्डलाइन एनजीओ (अल्पवयीन मुलाच्या बाबतीत)
- १०९८ वर कॉल करा
- जवळच्या पोलिस स्टेशनमध्ये
- 'ट्रॅक द मिसिंग चाइल्ड' पोर्टलवर ऑनलाइन (trackthemissingchild.gov.in)

**कालावधीः जून ते डिसेंबर ६**

- एकूण बेपत्ताः ३७०+
- मुलीः २६८+ (७२%)
- सर्वात जास्त बेपत्ता प्रकरणेः नोव्हेंबर (७१)
- दरमहा सरासरी बेपत्ता प्रकरणेः ५५ ते ६०




**■ बातमी /लेख, प्रीती दिपक नाईक,**

मुंबई ही देशाची आर्थिक राजधानी म्हणून ओळखली जाते. ती स्वप्नांची नगरी आहे. देशभरातून तरुण–तरुणी येथे त्यांची स्वप्न पूर्ण करण्यासाठी येत असताता. अभिनय जगात स्वतःचे नाव कमावण्याची आणि ग्लॅमर जगात स्वतःला सिद्ध करण्याची इच्छा अनेक मुली आणि मुलांच्या मनात असते. पण येथील चित्र वेगळचं पाहायला मिळत आहे. मुंबई पोलिसांकडून मिळालेल्या माहितीनुसार जून ते डिसेंबरच्या पहिल्या आठवड्यापर्यंत ३७० हून अधिक अल्पवयीन मुले बेपत्ता झाली आहेत. त्यापैकी २६८ मुली आहेत, जे एकूण प्रकरणांपैकी अंदाजे ७२ टक्के आहेत. एकूण दरमहा सरासरी ६० मुले बेपत्ता होतात. अल्पवयीन मुलींच्या बेपत्ता होण्यामुळे त्यांच्या सुरक्षिततेबद्दल गंभीर चिंता निर्माण होते.

मुंबईला आजकाल एक अतिशय चिंताजनक समस्या भेडसावत आहे. शहरात बेपत्ता मुलांच्या घटनांमध्ये अचानक वाढ झाली आहे. अवघ्या ३६ दिवसांत ८२ मुले बेपत्ता झाल्याच्या वृत्तांमुळे पोलिस, प्रशासन आणि पालकांमध्ये चिंता निर्माण झाली आहे. सर्वात चिंताजनक म्हणजे, या प्रकरणांमध्ये मुलींची संख्या जास्त असल्याचे वृत्त आहे. हा खुलासा अनेक गंभीर प्रश्न उपस्थित करतो हा केवळ योगायोग आहे की टोळीच्या वाढत्या कारवायांचे लक्षण आहे?

तपासातून असे समोर आले आहे की, बेपत्ता मुलांमध्ये मुलींची संख्या लक्षणीयरीत्या जास्त आहे. शाळेत, बाजारात किंवा त्यांच्या घराभोवती खेळताना अनेक मुले बेपत्ता झाली. बहुतेक प्रकरणांमध्ये, कोणतेही स्पष्ट संकेत सापडलेले नाहीत. काही प्रकरणांमध्ये, असे आढळून आले की मुले सोशल मीडिया किंवा अनोळखी व्यक्तींच्या संपर्कात होती. या आकडेवारीवरून शहरातील मुलांच्या सुरक्षेबाबत अनेक कमकुवतपणा उघड होतात.

**मानवी तस्करी टोळ्या सक्रिय आहेत का?**

पोलिस अनेक संभाव्य कोनांवर प्राथमिक तपास करत आहेत, मानवी तस्करी आणि बाल तस्करी टोळ्या, सोशल मीडियावर ऑनलाइन सौंदर्य आणि आमिष दाखवणे, घरगुती तणावामुळे घराबाहेर पडणारे अल्पवयीन मुलं–मुली, मजुरीसाठी किंवा बेकायदेशीर कृत्यांसाठी आमिष दाखवलेली मुले, संघटित टोळीचा अद्याप कोणताही ठोस पुरावा सापडला नसला तरी, या पॅटर्नने अनेक एजन्सींना सतर्क केले आहे.

**मुंबई पोलिसांनी पाळत वाढवली**

बेपत्ता प्रकरणांच्या वाढत्या संख्येमुळे पोलिसांना सक्रिय केले आहे. पोलिसांनी, सर्व पोलिस ठाण्यांसाठी हाय अलर्ट जारी केला, रेल्वे स्थानके, बस टर्मिनल आणि गर्दीच्या ठिकाणी वाढलेली दक्षता, तपासात सायबर सेलला सामील केले आहेत. सीसीटीव्ही फुटेजचे तपशीलवार विश्लेषण सुरू केले. शहरभरात हरवलेल्या मुलांचे फोटो प्रसारित केले. अनेक प्रकरणांमध्ये, मुले सुरक्षितपणे परत आली आहेत, परंतु मोठ्या संख्येने अद्याप सापडलेले नाहीत.

**पालकांसाठी इशारे – कोणत्या गोष्टींकडे लक्ष द्यावे?**

- ॲप्स वापरून मुलांचे लोकेशन ट्रॅक करा
- त्यांना अनोळखी लोकांपासून दूर राहण्यास शिकवा
- शाळेत ये–जा करताना आणि परत येताना सुरक्षित व्यवस्था करा मुलांच्या ऑनलाइन क्रियाकलापांवर लक्ष ठेवा कोणत्याही संशयास्पद क्रियाकलापांची तात्काळ तक्रार करा वाढत्या प्रकरणांची संख्या पाहता, कुटुंबाची दक्षता अत्यंत महत्त्वाची आहे.

**मुलींचा सहभाग जास्त का आहे?**

तस्करी करणाऱ्या टोळ्या अनेकदा मुलींना लक्ष्य करतात. सोशल मीडियावर ऑनलाइन फसवणूक आणि फसवणुकीच्या घटना वाढल्या आहेत. मुली भावनिकदृष्ट्या अधिक असुरक्षित आहेत, बऱ्याच प्रकरणांमध्ये, त्यांना नोकरी किंवा मॉडेलिंगच्या बहाण्याने आकर्षित केले गेले. ही परिस्थिती प्रशासनाला अधिक कठोर कारवाई करण्यास भाग पाडत आहे. ३६ दिवसांत मुंबईत ८२ मुले बेपत्ता होणे ही एक अतिशय गंभीर आणि चिंताजनक बाब आहे. मुलींची जास्त संख्या ही घटना आणखी संवेदनशील बनवते. पोलिसांचा तपास सुरू आहे, परंतु हे स्पष्ट आहे की शहराला मुलांच्या संरक्षणासाठी त्वरित आणि ठोस पावले उचलण्याची आवश्यकता आहे. पालक, समाज आणि प्रशासन -तिघांनीही - या आव्हानाला तोंड देण्यासाठी एकत्रितपणे काम केले पाहिजे.

### नोव्हेंबर महिन्यात सर्वाधिक बेपत्ता, भीतीदायक आकडे

# मुंबईतून २६८ मुली कुठे झाल्या गायब?

**■मिरारोड। प्रतिनिधी,**

देशाची आर्थिक राजधानी मुंबईमध्ये १८ वर्षांपर्यंत तरुण-तरुणी बेपत्ता होत असल्याच्या घटना सातत्याने वाढत आहेत. मुंबई पोलिसांकडून मिळालेल्या माहितीनुसार, जून ते डिसेंबरच्या पहिल्या आठवड्यापर्यंत मुंबईतून ३७० हून अधिक तरुण-तरुणी बेपत्ता झाल्या. यात २६८ मुली आहेत. हा आकडा एकूण घटनांच्या ७२ टक्के आहे. सर्वसाधारणपणे दर महिन्याला ६० मुलं बेपत्ता होतात. अल्पवयीन मुलं गायब होणं ही बाब त्याच्या सुरक्षेसाठी गंभीर चिंता निर्माण करणारी आहे.

**सीसीटीव्ही, मोबाइल ट्रॅकिंगच्या माध्यमातून तपास सुरू...**

मुंबई पोलिसांच्या मिसिंग प्रकरणात एका वरिष्ठ पोलीस अधिकाऱ्यांनी सांगितलं, अनेक प्रकरणात अल्पवयीन मुली मित्रांसोबत निघून जातात किंवा प्रेम प्रकरणात घर सोडून देतात. काही प्रकरणात मानवी तस्करीसह अन्य प्रकरणंही दिसून आली आहेत. ज्याचं गांभीर्य लक्षात घेऊन तपास सुरू आहे. सीसीटीव्ही फुटेज, मोबाइल ट्रॅकिंग आणि स्थानिक माहितीच्या आधारे बेपत्ती मुलींचा तपास सुरू आहे. मात्र दर महिन्याला नव्या तक्रारींमध्ये होणारी वाढ विभागाची चिंता वाढवणारी आहे, नवभारत टाइम्सने यासंदभार्तील वृत्त प्रसिद्ध केलं आहे.

**घर, कुटुंब आणि समाजाची जबाबदारी...**

६०० हून अधिक बेपत्ता मुली शोधण्याचा रेकॉर्ड केलेल्या मुंबई पोलिसांचे कर्मचारी राजेश पांडे यांनी सांगितलं, आई-वडिलांशिवाय कुटुंबातील सदस्य आणि शाळा व्यवस्थापकांना मुला-मुलींमधील वागणुकीत बदल, सोशल मीडियावरील हालचालींवर लक्ष ठेवून आहे. पालकांनी मुली अचानक गायब झाल्या तर विलंब न करता पोलीस तक्रार दाखल करावी. ही आपली जबाबदारी आहे.

**महिन्यांनुसार बेपत्ता मुलं-मुलींची आकडेवारी**

- जून – ७० (अल्पवयीन – ५६ )
- जुलै – ५९ (३७)
- ऑगस्ट – ५१ (३७)
- सप्टेंबर – ५१ (३७)
- ऑक्टोबर – ५७ (४१)
- नोव्हेंबर – ७१ (५२)
- डिसेंबर (६ तारखेपर्यंत) – ११ (८)



## पालिका प्रशासन लागले निवडणुकीच्या कामाला



**■विरार। प्रतिनिधी,**

महानगरपालिका निवडणुकीचा कार्यक्रम लवकरच जाहीर होणार आहे. त्यामुळे वसई–विरार महापालिका प्रशासन निवडणूक कामाच्या तयारीला लागले आहे. मतदान केंद्र तयार करणे, मतपेट्या ठेवण्यासाठी स्ट्रॉंग रूम तसेच मतमोजणी करण्यासाठी जागेची निवड आदी कामाचा आढावा आयुक्तांकडून नियमित घेतल्या जात आहे. वसई–विरार महापालिका क्षेत्रात २९ प्रभाग येतात. २८ प्रभागांमध्ये प्रत्येकी ४ नगरसेवक यावेळी निवडून द्यावयाचे आहेत. तर २९ व्या प्रभागातून तीन नगरसेवक निवडले जाणार आहेत. निवडणुकीच्या आनुषंगाने आरक्षण सोडत काढण्यात आली आहे. तसेच सुरक्षा व्यवस्था, स्ट्रॉंग रूमची ताकद, सीसीटीव्ही पाळत ठेवणे, अधिकारी आणि कर्मचाऱ्यांची व्यवस्था, उमेदवार आणि उमेदवारांच्या प्रतिनिधींसाठी बैठक व्यवस्था, स्वच्छतागृह, पिण्याच्या पाण्याची व्यवस्था यासह सर्व महत्त्वाच्या बाबींचा आढावा घेतला. यावेळी अतिरिक्त आयुक्त संजय हेरवाडे, दीपक सावंत, उपायुक्त स्वाती देशपांडे, प्रभारी शहर अभियंता प्रदीप पाचंगे, कार्यकारी अभियंता संजय कुलकर्णी, सुरेंद्र ठाकरे, अमोल जाधव, उपअभियंता सतीशकुमार सूर्यवंशी आणि इतर अधिकारी उपस्थित होते.

### २ तरूण आणि तरूणींचे फोटो, काळ्या बाहुल्या, नारळ, सुया, लिंबू, दारूच्या बाटल्या अन्

## जळलेल्या चितेतील अवशेष गायब... पुरोगामी महाराष्ट्रात चाललंय तरी काय?

**■पंढरपूर। प्रतिनिधी,**

शहरातील वैकुंठ स्मशानभूमीत काळ्या बाहुल्या, नारळ, सुया, लिंबू, दारूच्या बाटल्या आणि काही व्यक्तींचे फोटो अशी सामग्री गेल्या काही महिन्यांपासून वारंवार आढळत आहे. रात्रीच्या वेळी चितेजवळ अघोरी कृती केल्याची चिन्हे सापडत असल्याने परिसरात भीतीचं वातावरण तयार झालं आहे.

रहिवाशांच्या म्हणण्यानुसार अमावस्या आणि पौर्णिमेच्या रात्री अशा वस्तूंचे प्रमाण वाढते. काही ठिकाणी कोंबडीचे अवशेष, भावल्या, कवळ आणि इतर विचित्र साहित्य आढळत असल्याचेही सांगितले जाते. त्यामुळे येथे कोणीतरी जादूटोण्याचे प्रकार करत असल्याची चर्चा पसरली आहे. याशिवाय स्मशानभूमीत जळलेल्या चितेचे काही अवशेषही गायब होत असल्याची तक्रार नागरिकांनी केली आहे. या अवशेषांच्या गायब होण्यामुळे परिसरातील संशय आणखी वाढला



आहे.

नागरिकांनी वारंवार प्रशासनाला माहिती दिल्यानंतरही कोणतीही ठोस दखल घेतली गेली नसल्याने नाराजी वाढली आहे. वाढत्या असुरक्षिततेमुळे स्थानिकांनी तातडीची कारवाई आणि नियंत्रण उपाययोजनांची मागणी पुन्हा केली आहे. रहिवाशांनी स्मशानभूमीत नियमित पोलीस गस्त, सीसीटीव्ही कॅमेरे आणि संशयास्पद हालचालींवर लक्ष ठेवण्यासाठी विशेष पथक नेमण्याची मागणी केली आहे. तसेच घटनांची सखोल चौकशी करून दोषींवर कारवाई करावी, असे त्यांचे म्हणणे आहे.

कायद्यातील तरतूद आणि अंधश्रद्धा निर्मूलन महाराष्ट्रात अंधश्रद्धा प्रतिबंधक कायदा लागू आहे. या कायद्यानुसार भोंदूपणा, अघोरी विधी, जादूटोणा किंवा सार्वजनिक जागी तांत्रिक कृती करणे दंडनीय अपराध आहे. स्मशानभूमीत रात्री अशा प्रकारचे विधी करणे कायद्याच्या विरोधात असून दोषींवर कठोर कारवाई होऊ शकते. त्यामुळे या घटनांवर त्वरित कारवाई करावी, अशी नागरिकांची मागणी आहे.

नातेपुते शहरात आणि स्मशानभूमीत पौर्णिमा आणि अमावास्येला विशेष पथक नेमून असे अघोरी कृत्य करून समाजात भयभीत वातावरण तयार करणाऱ्या लोकांचा आम्ही बंदोबस्त करणार आहोत. त्याबाबत संशयितांची नावे पोलिस खात्यास कळवून नागरिकांनी सहकार्य करावे. संबंधित नागरिकाचे नाव गुप्त राखण्याची हमी पोलिस खाते घेत आहे, महारुद्र परजणे, नातेपुते पोलीस पोलीस स्टेशन.

## तक्रार करणाराच निघाला आरोपी, तोतया पोलीस प्रकरणी दोघांना अटक

**■मिरारोड। प्रतिनिधी,**

दोन इसमांनी पोलीस असल्याचे सांगत २,२३,०००रूपयांची रक्कम गाडीच्या डिक्कीमधून काढून घेत पळ काढल्या बाबत काशिगांव पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला होता.मात्र तपासात तक्रारदारच आरोपी निघाला असून त्याला अटक करत फसवणुकीचे २,२३,०००/रुपये हस्तगत करण्यात गुन्हे प्रकटीकरण कक्ष, काशिगांव पोलीस ठाणे यांना यश मिळाले आहे. सुशांत दशरथ मोहिते हे त्यांच्या दुचाकीने घोडबंदर रोड, काजुपाडा येथून जात असताना दोन व्यक्तींनी पोलीस असल्याचा खोटा दावा करून त्यांना थांबवले. त्यांनी दुचाकीचे कागदपत्रे मागितली आणि डिक्की तपासत असताना डिक्कीतून मिळून आलेली रक्कम २,२३,०००/– घेऊन फरार झाले, अशी तक्रार काशिगांव पोलीस स्टेशनमध्ये नोंदवण्यात आली होती.

तक्रारदार यांच्या तक्रारीवरुन दोन तोतया पोलिसांविरुद्ध काशिगांव पोलीस स्टेशन मध्ये कलम ११५(२), ३१९, ३(५) प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला .नमूद गुन्ह्याचा प्रकार



गंभीर स्वरुपाचा असल्याने वरिष्ठांनी सदर घटनेची खात्री करुन आरोपीतांचा शोध घेवून त्यांना अटक करण्याच्या सुचना काशिगांव पोलीस स्टेशनला दिल्या होत्या. काशिगाव पोलीस यांनी सखोल तपास आणि घटनास्थळी केलेल्या कौशल्यपूर्ण तपासामुळे निष्पन्न झाले की, ही संपूर्ण योजना तक्रारदार यांनीच रचलेली होती. पैशांचा अपहार करण्यासाठी तक्रारदार यांनी नकली पोलीस ड्रामा रचला. ज्यात त्याचा साथीदारही सहभागी होता.त्यानंतर काशिगाव पोलिसांनी दोन्ही आरोपींना अटक केली असून २,२३,०००/– रोख रक्कम आणि चोरीस वापरलेले वाहन जप्त करण्यात आले आहे.

## मिरारोड येथे ५ दुकानांवर धाड, ४६८ किलो गोमांस जप्त

**■भाईदर। प्रतिनिधी,**

मिरारोड येथील नयानगर परिसरातील पाच वेगवेगळ्या मांस विक्रीच्या दुकानांवर पोलिसांनी मोठी कारवाई करत सुमारे ४६८ किलो वजनाचे संशयित गोमांस जप्त केले आहे. जप्त करण्यात आलेल्या मालाची किंमत १ लाख ८७ हजार २०० रुपये इतकी आहे. या प्रकरणी पाच आरोपींना ताब्यात घेण्यात आले असून, त्यांचे साथीदार आणि दुकान मालकांचा शोध सुरू आहे. नयानगर येथे मिळालेल्या माहितीनुसार नरेंद्र पार्क परिसरात एकाच दिवशी पाच ठिकाणी धाडी टाकल्या. या धाडीत मोठ्या प्रमाणात प्रतिबंधीत गोमांसाची साठवणूक आणि विक्री होत असल्याचे उघड झाले. या कारवाईत आयफा चिकन शॉप,आलीया मीट शॉप, महाराष्ट्र बिफ शॉप, रिफत बिफ शॉप, मारीया बिफ शॉप या मटण दुकानांतून एकूण ४६८ किलो वजनाचे संशयित गोमांस जप्त करण्यात आले आहे. या कारवाईत पोलिसांनी आमीर इरफान शेख, अरमान अब्दुल हसन खान, मोहोम्मद इरफान मोहोम्मद रईस कुरेशी, नजाकत अश्रफ कुरेशी, सानु शफिक मोहोम्मद या पाच जणांना ताब्यात घेतले आहे. याशिवाय, आलीया मीट शॉपचा मालक सुलतान कुरेशी, महाराष्ट्र बिफ शॉपला माल पुरवणारा अन्वर उमर खान, रिफत बिफ शॉपचा मालक लियाकत कुरेशी आणि मारीया बिफ शॉपचे मालक इम्रान कुरेशी व चालक तौसिफ शफिक कुरेशी हे फरार झाले असून पोलीस त्यांचा शोध घेत आहेत. सर्व आरोपींनी संगनमत करून प्रतिबंधीत गोमांसाची साठवणूक व विक्री केल्याचे निष्पन्न झाले आहे. या गुन्ह्याचा पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक रंजित नलावडे हे करत आहेत.

## रात्रीच्या अंधारात महिलांना एकटे गाठायचा अन्...

### २४५ सीसीटीव्ही तपासल्यावर रोडरोमिओ गजाआड, नेमकं काय करायचा?

**■पुणे। प्रतिनिधी,**

रात्रीच्या वेळी सुनसान रस्त्यावर एकट्या महिलांना हेरून त्यांची छेड काढायचा. गेल्या वर्षभरापासून पोलिसांना गुंगारा देणाऱ्या सराईत गुन्हेगाराला अटक करण्यात विमानतळ पोलिसांना यश आले आहे. तब्बल २४५ सीसीटीव्ही कॅमेऱ्यांचे फुटेज तपासून पोलिसांनी या विकृत आरोपीच्या मुसक्या आवळल्या आहेत. सागर राम सोनवणे (वय २२, रा. भोसरी) असे अटक करण्यात आलेल्या आरोपीचे नाव आहे. विमानतळ पोलीस ठाण्याच्या हद्दीतील लोहगाव, गणेश पार्क परिसरात नुकतीच एक धक्कादायक घटना घडली होती. एका दुचाकीस्वार अज्ञात तरुणाने एका अल्पवयीन मुलीचा पाठलाग करून तिचा विनयभंग केला होता. याप्रकरणी भारतीय न्याय संहिता कलम ७४, ७५ आणि बाललैंगिक अत्याचार प्रतिबंधक कायदा कलम ८ व १२ अन्वये गुन्हा (क्र. ६२४/२०२५) दाखल करण्यात आला होता. या भागात अशा घटना वारंवार घडत असल्याने महिलांमध्ये भीतीचे वातावरण पसरले होते. वरिष्ठ पोलीस निरीक्षक गोविंद जाधव यांनी या प्रकरणाचे गांभीर्य ओळखून आरोपीला तात्काळ पकडण्याचे आदेश दिले. आरोपीचा कोणताही थांगपत्ता नसताना तपास पथकाने विमाननगर, विश्रांतवाडी, दिघी आणि भोसरी या परिसरातील तब्बल २४५ सीसीटीव्ही कॅमेरे तपासले. तांत्रिक विश्लेषणाच्या आधारे पोलिसांना आरोपीचा सुगावा लागला आणि सापळा रचून त्याला शिताफीने अटक करण्यात आली. ही कारवाई पोलीस आयुक्त अमितेश कुमार, सहआयुक्त रंजनकुमार शर्मा, अपर पोलीस आयुक्त मनोज पाटील, उपायुक्त सोमय मुंडे आणि एसीपी प्रांजली सोनवणे यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आली. वरिष्ठ पोलीस निरीक्षक गोविंद जाधव आणि पोलीस निरीक्षक (गुन्हे) शरद शेळके यांच्या नेतृत्वाखालील तपास पथकाने ही कामगिरी फत्ते केली.



आरोपीला पोलिसांनी अटक केल्यानंतर या प्रकरणाची व्याप्ती किती मोठी आहे हे समोर आलं. हा विकृत गुन्हेगार कशा पद्धतीने महिला हेरायचा आणि त्याची गुन्ह्याची पद्धत कशी होती हे ऐकून पोलीस देखील चक्रावून गेले. पोलीस तपासात आरोपी सागर सोनवणे याची गुन्हे करण्याची पद्धत समोर आली आहे. तो रात्रीच्या वेळी दुचाकीवरून फिरत असे. सुनसान रस्ते किंवा अंधार असलेल्या ठिकाणी एकटी महिला किंवा मुलगी दिसली की तो त्यांचा विनयभंग करून वेगाने पळून जात असे. पोलिसांच्या हाती लागू नये म्हणून तो सीसीटीव्ही नसलेले रस्ते किंवा आडवाटांची निवड करायचा. मात्र, पोलिसांनी केलेल्या कसून चौकशीत सागरने विमानतळ पोलीस ठाण्याच्या हद्दीत आतापर्यंत ५ वेळा विनयभंग केल्याची कबुली दिली आहे. याव्यतिरिक्त इतर पोलीस ठाण्यांच्या हद्दीतही त्याने असे गुन्हे केल्याचे निष्पन्न झाले आहे.

### उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदेंच्या गावापासून जवळच सापडला ११५ कोटींचा ड्रग्स साठा

## क्राईम ब्रँचच्या विशेष पथकाने 'असा' मारला छापा!




**छाप्याची पार्श्वभूमी**

सावळी गाव हे जावळी तालुक्यातील एक शांत ग्रामीण भाग आहे, जो उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या मूळ गाव दरे (महाबळेश्वर तालुका, पूर्वी जावळी) पासून सुमारे १५-२० किलोमीटर अंतरावर आहे. हे गाव कोयना नदीच्या काठावर वसलेले असून, पर्यटन आणि शेतीवर अवलंबून आहे. मात्र, या शांत गावात गुप्तपणे चालू असलेल्या ड्रग्स कारखान्याचा पदार्फाश झाल्याने स्थानिक नागरिकांमध्ये आश्चर्य आणि भीती निर्माण झाली आहे.

**■सातारा। प्रतिनिधी,**

महाराष्ट्रात एक खळबळ उडवणारी घटना घडली आहे. उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या मूळ गाव दरेपासून अवघ्या काही किलोमीटर अंतरावर, सातारा जिल्ह्यातील जावळी तालुक्यातील सावरी गावात कोट्यवधी रुपयांचा एमडी (मेफेड्रोन) ड्रग्स कारखाना उघडकीस आला.

मुंबई क्राईम ब्रँचच्या विशेष पथकाने शनिवारी (१३ डिसेंबर) गावात धडक कारवाई करून कारखाना उद्धवस्त केला. या छाप्यात चार संशयितांना ताब्यात घेण्यात आले असून, प्राथमिक अंदाजानुसार मोठ्या प्रमाणात एमडी ड्रग्सचा साठा जप्त करण्यात आला आहे. या प्रकरणाने राजकीय वतुर्ळात खळबळ उडाली आहे. पोलिसांकडून तपास सुरू असल्याने राजकीय पाठिंबा किंवा वरदहस्त असल्याची शक्यताही तपासात समोर येईल का, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

माहितीनुसार, मुंबई आणि पुण्यातील अलीकडील ड्रग्स प्रकरणांनंतर पोलिसांना सावळी गावात संशयित कारवाई सुरू असल्याची माहिती मिळाली होती. मुंबई क्राईम ब्रँचने या माहितीची पडताळणी करून गुरुवार रात्रीपासून गुप्त तपास सुरू केला. त्यानंतर आता त्यावर छापा टाकला. या शेडमध्ये एमडी ड्रग्स तयार करण्याचे यंत्रसामग्री, रसायने आणि तयार ड्रग्सचा मोठा साठा सापडला. प्राथमिक अंदाजानुसार, जप्त ड्रग्सची किंमत तब्बल ११४ ते ११५ कोटी रुपये एवढी आहे.

आज सकाळपासून सुरू असलेल्या या धडक कारवाईत सुमारे ११४ ते ११५ कोटी रुपयांचा एमडी (मेफेड्रोन) ड्रग्स साठा, उत्पादन यंत्रसामग्री आणि इतर मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. ही सातारा जिल्ह्याच्या इतिहासातील आतापर्यंतची सर्वात मोठी ड्रग्स कारवाई असल्याचे समोर येत आहे.

मुंबई क्राईम ब्रँचच्या विशेष पथकाने सावरी गावातील झाडी–जंगलाच्या आड एका शेडमध्ये चालू असलेल्या एमडी ड्रग्स उत्पादन कारखान्यावर छापा टाकला. प्राथमिक माहितीनुसार, या शेडमध्ये एमडी ड्रग्सची मोठ्या प्रमाणात निर्मिती सुरू होती. छाप्यात तीन कारागीरांसह एक स्थानिक व्यक्ती अशा एकूण चार संशयितांना ताब्यात घेण्यात आले आहे.



संपादकीय

संपादक
दिपक मोरेश्वर नाईक

# शेतकऱ्याचं मरण



प्रयत्न करूनही काही प्रश्न जेव्हां सुटत नाहीत, तेव्हां त्यावर तात्पुरती उपाययोजना करून प्रश्न बाजूला सारावा लागतो. तात्पुरत्या उपाययोजना सुरू असतात, त्यातून बऱ्याचदा प्रश्नाची दखल घेतल्याचा दिलासाही मिळतो, पण मूळ जखम तशीच भळभळत राहते. तिचं दुःख कमी होत नाही. महाराष्ट्रातल्या शेतकऱ्यांच्या आत्महत्यांचा प्रश्न नेमका असाच झाला आहे. आत्महत्या थांबत नाहीत, त्यांची तीव्रताही कमी होत नाही. उपाययोजना म्हणून पॅकेज, व्यक्तिगत आर्थिक मदत, उत्तम बियाणं, खतांत सवलत-असं बरंच काही केलं गेलं. अडचणीतल्या शेतकऱ्याच्या मानसिक आधारासाठी तज्ज्ञांना घेऊन काही प्रयोगही केले गेले. बीड जिल्ह्यात ‘मानवलोक’सारख्या संस्थेने ‘आशाताई’सारख्या समुपदेशिका घडवल्या. प्रयोग यशस्वी झाले. काही आत्महत्या रोखल्या गेल्याही. पण, त्याने एकूण आत्महत्यांच्या प्रमाणात घट झाल्याचं दिसलं नाही. वेगवेगळ्या उपायांनंतरही त्यात फारसा फरक नाही. नागपूरला सुरू असलेल्या महाराष्ट्र विधिमंडळाच्या हिवाळी अधिवेशनात गुरुवारी विधान परिषदेत सरकारकडून जी आकडेवारी दिली गेली, ती याचीच पुष्टी करणारी आहे. गेल्या नऊ महिन्यांत राज्यात ७८१ शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्या. सर्वात जास्त आत्महत्या विदर्भात, नागपूर विभागात( २९६) असून त्यानंतर मराठवाडा (२१२) आहे. राष्ट्रीय गुन्हे नोंद अहवालात प्रसिद्ध झालेली आकडेवारी पाहिली, तर देशात शेतकऱ्यांच्या जितक्या आत्महत्या झाल्या, त्यातल्या ५० टक्के एकट्या महाराष्ट्रात आहेत. राज्यात एकूण ६ हजार ६६९ आत्महत्यांची नोंद आहे. त्यातल्या ४ हजार १५० आत्महत्या जमीन मालक शेतकऱ्यांच्या, तर २ हजार ५१९ भूमिहीन शेतमजुरांच्या आहेत. गेल्या चाळीसेक वर्षांपासून शेतकऱ्यांच्या आत्महत्या ठळकपणे चर्चेत असून त्यात सुरुवातीपासूनच विदर्भ आणि मराठवाडा आघाडीवर आहे. विदर्भ-मराठवाड्यातील या दुःस्थितीच्या कारणांचा विविध अंगांनी अभ्यास केला गेला. त्यात शेतीतील अडचणींबरोबरच अन्य कौटुंबिक, सामाजिक कारणं-दबाव, चालीरीती यांचाही विचार झाला. त्यांचे निष्कर्ष आपल्यासमोर आहेत. ते सर्वमान्यही आहेत. पण, त्यातल्या एकेका कारणाला लक्ष्य करून त्यासाठी प्रबोधनात्मक कामाला म्हणावा तसा जोर लागल्याचं दिसत नाही. सरकारच्या औपचारिक यंत्रणांकडून यावर इलाज होईल, असं वाटत नाही. शेतीतल्या अडचणींचा विचार करताना पूर्वी शेतमालाच्या बाजारभावाचा विषय सर्वप्रथम समोर यायचा. काही शेतमालांचे भाव आधारभूत किमतीच्या टेकूने सरकारला विशिष्ट पातळीवर सांभाळता येतात. पण, भाजीपाला किंवा फळांसारख्या नाशवंत मालासाठी हे शक्य होत नाही. ज्या मालाला आधारभूत किमतीचा थोडाबहुत उपाय आहे, तिथेही मालाचा अपेक्षित दर्जा आणि यंत्रणेतल्या गैरव्यवहारांचे अडथळे आहेतच. त्यामुळे, जिथे बाजारभावाची शाश्वती देता येत नाही, तिथे शेतीतील गुंतवणुकीचा खर्च कमी करण्यासाठी मदत देऊन झाली. पण, त्याचाही काही उपयोग झालेला दिसत नाही. मानवनिर्मित कारणं दूर करण्याचा किंवा बाजार व्यवस्थेच्या अंतर्गत असणाऱ्या समस्यांना उत्तरं शोधण्याचा प्रयत्न गेली अनेक वर्षं सुरू असूनही त्याला यश येत नसताना आता माणसाच्या नियंत्रणापलीकडच्या बाबींची शेतीवर आक्रमणं सुरू झाली आहेत. गेली काही वर्षं महाराष्ट्राला एकाच वेळी दुष्काळ आणि अतिवृष्टी या दोन्ही नैसर्गिक आपत्तींना तोंड द्यावं लागतं आहे. वातावरणीय बदलांचा हा परिणाम आहे. जगात ज्या देशांना वातावरणीय बदलांच्या दुष्परिणामांना सामोरं जावं लागतं आहे, त्यात भारत नवव्या क्रमांकावर आहे! गेली काही वर्षं हिमालयापासून केरळपर्यंत आणि पश्चिम किनारपट्टीपासून पूर्व किनारपट्टीपर्यंत ढगफुटी, चक्रीवादळांचा रतीब सुरू आहे. किनारपट्टीवरच्या शेतीबरोबरच मच्छीमारांचं मोठं नुकसान होतं आहे. जगातल्या तीन अब्जांपेक्षा जास्त लोकसंख्या (सुमारे ४० टक्के) गेली ३० वर्षं तीव्र वातावरणीय बदलांनी वारंवार उद्ध्वस्त होते आहे. ही लोकसंख्या ज्या अकरा देशांत आहे, त्यातच भारत नववा आहे. कृषीप्रधान भारताला या अस्थिर वातावरणाचा विचार करून आपल्या कृषी क्षेत्रात आमूलाग्र बदल करावे लागणार आहेत. त्याची जाणीव आपल्याकडे आता दिसू लागली आहेत. धोरणात्मक पातळीवर त्याच्या पर्यायांची भाषा बोलली जाऊ लागली आहे. केवळ चर्चेत न ठेवता याबाबतच्या उपाययोजना लवकर प्रत्यक्ष आणल्या नाहीत, तर येत्या काळात शेतकऱ्यांच्या आत्महत्यांचा आकडा भयावह होण्याची भीती आहे. महाराष्ट्रातल्या शेतीवर आणखी एक गंभीर संकट आलं आहे. ते आहे, वन्य प्राण्यांचं. चर्चा जरी हिंस्र प्राण्यांची होत असली, तरी खरं संकट वन्य प्राण्यांचंच आहे. त्याची जाणीव अजून महाराष्ट्राला तितकीशी दिसत नाही. कोकण आणि गडचिरोलीत हत्ती; रानडुक्करं, माकडं, हरणं, निलगाई शेतीचं मोठं नुकसान करत आहेत. कोल्हे, लांडगे, मुंगूस, साळींदरं गावागावांत सर्रास दिसू लागली आहेत. मध्य महाराष्ट्र, मराठवाडा आणि विदर्भात हरणं, काळवीटं, सांबरांनी शेतीची वाट लावली आहे. मोर, उंदीर, अस्वलं, पक्षांचे थवे राज्याच्या वेगवेगळ्या भागांत शेतात हैदोस घालत आहेत. या सगळ्याच्या परिणामी यानंतर विशिष्ट कीटक, किडींचा प्रादुर्भाव होण्याची शक्यता तज्ज्ञ वर्तवत आहेत. चर्चा फक्त बिबट्यांची आहे. पण जंगलं साफ केल्यामुळे ही सगळी वन्य मंडळी शेतात उतरली आहेत. त्यांनीही शेतकरी कावला आहे. उद्याच्या आत्महत्यांना ही नवी कारणंही कारणीभूत ठरतील, इतकी ती गंभीर आहेत. उद्याच्या आत्महत्या रोखण्यासाठी त्याची गांभीर्याने आजच दखल घेतली पाहिजे.

# मोदी सरकारचा संचार साथी की स्मार्ट हेरगिरी?



**गेल्या आठवड्यात राजधानी दिल्लीतल्या कडाक्याच्या थंडीत केंद्र सरकारनं स्मार्टफोन उत्पादकांसाठी एक आदेश जारी करताच दिल्लीतलं राजकीय वातावरण अचानक तापलं. हा आदेश होता सर्व स्मार्टफोन्समध्ये संचार साथी ॲप प्री-इन्स्टॉल करण्याबाबतचा. संचार साथी ॲपच्या सक्तीवरून दिल्लीपासून गल्लीपर्यंत डिजिटल सिक्युरिटी आणि जनतेच्या गोपनीयतेवर प्रश्नचिन्ह उपस्थित होऊ लागले. या ॲपच्या सक्तीविरोधात एकवटलेल्या विरोधकांच्या दबावापुढं झुकत केंद्र सरकारनं यू-टर्न घेतलाय खरा, परंतु तुमच्या-माझ्या स्मार्टफोन्समध्ये घुसून सरकारी हेरगिरीचा धोका पूर्णपणे टळलेला नाहीय. त्यामुळे सावध राहण्याची गरज आहे.**

केंद्रातलं मोदी सरकार तुमच्या स्मार्टफोनची सुरक्षा करू पाहतंय की हेरगिरी? एक दिवसआधी संचार साथी ॲपच्या प्री-इन्स्टॉलेशन सक्तीचा आदेश दिला जातो आणि या ॲप सक्तीवरून विरोधकांनी आगपाखड करताच अवघ्या २४ तासांत सरकारला यू-टर्न घ्यावा लागतो, असं का? हे ॲप स्मार्टफोनमधून डिलिट करता येईल, असा केंद्र सरकारचा दावा असेल तर हे ॲप प्री-इन्स्टॉल करण्याची सक्ती तरी का? असे एक ना अनेक प्रश्न व तितकंच संशयाचं वातावरण संचार साथी ॲपवरून मागच्या काही दिवसांमध्ये निर्माण झालंय.

देशात मागच्या काही वर्षांमध्ये सायबर फ्रॉडचे प्रकार कैकपटींनी वाढलेत. ज्येष्ठ नागरिक व महिलांची डिजिटल अरेस्टच्या नावाने होणारी फसवणूक, फेक कॉल्स, चोरीच्या स्मार्टफोनची खरेदी-विक्री, चोरीचे फोन व खोट्या क्रमांकावरून चालणारे गैरप्रकार रोखण्यासाठी संचार साथी नावाचं वेब पोर्टल केंद्र सरकारच्या दूरसंचार विभागानं २०२३ साली सुरू केलं होतं. यानंतर याच वेब पोर्टलचं स्मार्टफोन ॲप्लिकेशन १७ जानेवारी २०२५ रोजी लॉन्च करण्यात आलं. जे ॲंड्रॉईड आणि आयओएस दोन्ही स्मार्टफोनधारकांना इन्स्टॉल करता येतं. हे ॲप म्हणजे एकप्रकारचं सायबर सिक्युरिटी टूल आहे. या ॲपद्वारे चोरी झालेले/हरवलेले फोन ब्लॉक किंवा ट्रॅक केले जाऊ शकतात.

एखाद्या व्यक्तीच्या नावावर किती सिम कार्ड सुरू आहेत ते शोधून काढता येऊ शकतं. आपल्या नावे गैरप्रकारानं सुरू असलेलं सिम कार्ड बंद करता येऊ शकतं. फेक कॉलची तक्रार नोंदवता येऊ शकतं. हे ॲप थेटपणे सेंट्रल इक्विपमेंट आयडेंटिटी रजिस्टर (सीईआयआर) शी जोडलेलं आहे. जिथं देशातल्या सर्व स्मार्टफोन्सचा आयएमईआय क्रमांक नोंदवलेला असतो. त्यामुळं सेकंड हँड फोन खरेदी करण्याआधी त्याचा आयएमईआय क्रमांक पडताळून पाहून तो स्मार्टफोन चोरीचा आहे किंवा नाही याची खातरजमा करता येऊ शकतं. केंद्रीय दळणवळणमंत्री ज्योतिरादित्य सिंधिया यांनी दिलेल्या माहितीनुसार, आतापर्यंत २० कोटी लोकांनी संचार साथी वेब पोर्टलचा वापर केला असून १५ कोटी लोक हे ॲप वापरत आहेत. या ॲपच्या माध्यमातून हरवलेले, चोरी गेलेले २६ लाख मोबाईल फोन ट्रेस करण्यात आलेत व त्यापैकी ७.२३ लाख मोबाईल फोन मिळवून पुन्हा फोन मालकांना सुपूर्द करण्यात आले. अनेकांच्या नावे सुरू असलेले ४०.९६ लाख फसवे मोबाईल कनेक्शन ओळखून ते नागरिकांच्या तक्रारीनुसार डिस्कनेक्ट करण्यात आलेत. ६.२ लाख फसवणुकीशी संबंधित आयएमइआय क्रमांक ब्लॉक करण्यात आलेत.

या ॲपचे फायदे पाहता देशातील सर्व नागरिकांच्या स्मार्टफोन्समध्ये हे ॲप असावं अशी सरकारची इच्छा आहे. नक्कीच हा एक स्तुत्य उपक्रम म्हणता येईल. परंतु म्हणून या ॲपची सक्ती करणं कितपत योग्य आहे असा प्रश्न युजर्स आणि स्मार्टफोन उत्पादकांना पडलाय. केंद्रीय दूरसंचार विभागानं २८ नोव्हेंबर २०२५ रोजी सायबर सिक्युरिटी ॲमेंडमेंटच्या हवाल्यानं सर्व स्मार्टफोन उत्पादक व आयातदार कंपन्यांसाठी एक परिपत्रक (नोटिफिकेशन) काढलं होतं. या परिपत्रकानुसार मार्च २०२६ पासून विकल्या जाणाऱ्या सर्व नव्या स्मार्टफोन्समध्ये ‘संचार साथी’ हे ॲप प्री-इन्स्टॉल करणं आणि जुन्या स्मार्टफोन्समध्ये सॉफ्टवेअर अपडेटच्या माध्यमातून हे ॲप इन्स्टॉल करण्याची व्यवस्था करणं बंधनकारक करण्यात आलं होतं. कंपन्यांनी ९० दिवसांच्या आत नियमांची पूर्तता करून १२० दिवसांच्या आत यासंबंधीचा रिपोर्ट सादर करायला सांगितलं होतं. या नोटिफिकेशनमधील नियम क्रमांक ७ बी वर प्रामुख्यानं आक्षेप नोंदवण्यात आले. ज्यामध्ये सांगण्यात आलं होतं की युजरला वाटलं तरी हे ॲप अन-इन्स्टॉल किंवा डिलिट करता येऊ नये. हे ॲप जे जे ॲक्सेस मागतंय, त्यालाही युजरला ब्लॉक करता येऊ नये.

आता हे ॲक्सेस म्हणजे काय तर आपल्या स्मार्टफोनमधील घुसखोरीचे सर्वाधिकार. हे ॲप स्मार्टफोनमध्ये इन्स्टॉल करताना सर्वात पहिल्यांदा आपल्या फोन क्रमाकांचं रजिस्ट्रेशन करावं लागतं. ॲंड्रॉईड स्मार्टफोन्सवर तर हे रजिस्ट्रेशन आपोआपच होतं. यानंतर हे ॲप कॉल लॉग आणि एसएमएसचा पूर्ण ॲक्सेस मागतं. एखाद्या युजरला फ्रॉड कॉलची तक्रार नोंदवायची असल्यास स्क्रीनशॉट अपलोड करावे लागतात. त्यासाठी फोटो आणि फाईलचा ॲक्सेस द्यावा लागतो. आयएमईआय बार कोड स्कॅन करण्यासाठी कॅमेऱ्याचाही ॲक्सेस द्यावाच लागतो. अशा रितीनं संचार साथी ॲपला आपल्या स्मार्टफोनमध्ये कुणाकुणाचे फोन क्रमांक आहेत, हे कळू शकतं. त्यांचा पूर्ण ॲक्सेस मिळू शकतो. आपण दिवसभरात किंवा अगदी मध्यरात्रीही फोनवरून कुणाशी बोलतोय, किती वेळ, कुठल्या खासगी विषयावर बोलतोय हे कळू शकतं. आपल्या फाईल-फोल्डरमधील खासगी माहिती, आपले पर्सनल फोटो-व्हिडिओचा ॲक्सेस या ॲपला मिळतो. आपला स्मार्टफोन म्हणजे चालतं-फिरतं प्रायव्हेट लॉकर आहे. ज्याद्वारे आपण सर्व आर्थिक व्यवहार करतो, आपल्या स्मार्टफोनमध्ये आपल्या बँकेचे तसेच मेडिकल तपशील असतात. आपल्याला एसएमएसद्वारे ओटीपी येतो हे सर्वकाही या ॲपच्या माध्यमातून सरकारला मिळू शकतं.

अनेकांचा असाही तर्क आहे की व्हॉट्सॲप, इन्स्टा, एफबी, एक्स आदी सोशल मीडिया ॲप इन्स्टॉल करतानाही युजरकडून हे सर्व ॲक्सेस मागितलेच जातात. परंतु इथं मुद्दा सक्तीचा येतो. हे ॲप्स आपल्या स्मार्टफोनमध्ये डाऊनलोड करायचे किंवा नाही याचा सर्वस्वी अधिकार युजर्सचा असतो. युजरला वाटलं तरच ते हे ॲप इन्स्टॉल करतील नाहीतर नाही, हा निर्णय त्यांचा. परंतु इथं तर सरकार सरळसरळ ॲपची सक्तीच करतंय. शाओमी, विवो, ओप्पो आदी सारख्या चिनी स्मार्टफोन उत्पादक कंपन्या अनेकदा ब्रँड-प्रमोशन किंवा विशिष्ट ॲप्स सिस्टम ॲप्स म्हणून प्री-इन्स्टॉल करतात. सध्या, भारतात असे प्री-इन्स्टॉल ॲप्स काढून टाकण्याचा अधिकार कायदेशीररित्या युजर्सला नाही, म्हणून ते प्री-इन्स्टॉल ॲप काढून टाकू शकत नाहीत.

हे ॲप्स ब्लोटवेअर म्हणून युजर्सच्या स्मार्टफोनमध्ये बॅकग्राऊंडला रन होत राहतात आणि युजर्सचा डेटा चोरत राहतात, ही भारतातील एक गंभीर समस्या आहे. याउलट युरोपियन युनियन आपल्या देशातील युसर्जच्या डेटा सिक्युरिटीची पुरेपूर काळजी घेतं. स्मार्टफोन उत्पादकांनं मोबाईलमध्ये प्री-इन्स्टॉल केलेले कुठलेही ॲप युजर्सला काढून टाकता येतात. अगदी ॲपल किंवा गुगललाही डीफॉल्ट ॲप ठेवता येत नाहीत. फोन सुरू करताच युजरला फ्री चॉइस स्क्रीनचा पर्याय मिळतो. त्याला हवे ते ॲप्स तो स्मार्टफोनमध्ये ठेवू किंवा काढून टाकू शकतो. अमेरिकेतही स्मार्टफोन उत्पादक कंपन्यांना असे बंधन नाही. डिफॉल्ट ॲप/ब्लोटवेअर टाकून भारतीय नागरिकांचा डेटा चोरी करणाऱ्या, हा डेटा बाजारात खुलेआमपणे विकणाऱ्या कंपन्यांना धडा शिकवण्याऐवजी व भारतात डेटा सिक्युरिटी ॲक्ट आणण्याच्या दृष्टीनं पाऊलं उचलण्याऐवजी केंद्र सरकार स्वतः या कंपन्यांच्या रांगेत बसू पाहतंय.

२०२१ मध्ये इस्त्रायलच्या पेगसस स्पायवेअरचा वापर करून केंद्र सरकार विरोधकांवर हेरगिरी करत असल्याचे आरोप झाले होते. चीन, रशियात सरकारकडून जनतेवर लक्ष ठेवण्यासाठी असे ॲप चालवले जातात. भारततही मोदी सरकार तसा प्रयत्न करू पाहतंय का, असा प्रश्न विरोधकांनी उपस्थित केला. त्यानंतर ‘संचार साथी’ ॲप किती फायदेशीर आहे हे सांगून ज्योतिरादित्य सिंधिया यांनी विरोधकांचे आरोप फेटाळून लावले. हे ॲप कुणालाही डिलिट करता येईल असंही त्यांनी तोंडी सांगितलंय. प्रत्यक्षात केंद्र सरकारनं काढलेलं नोटिफिकेशन काही वेगळंच सांगतंय. हे ॲप इतकंच चांगलं आहे तर ते अधिकाधिक लोकांनी इन्स्टॉल करावं म्हणून सरकारला जनजागृती मोहीम चालवता आली असती. त्याऐवजी गुपचूप नोटिफिकेशन काढून ॲपची सक्ती कशासाठी? तेही रॉयटर्ससारख्या आंतरराष्ट्रीय वृत्तसंस्थेनं बातमी लिक केल्यावर १ डिसेंबरपासून हे वृत्त आगीसारखं पसरलं, सोशल मीडियावर व्हायरल झालं तेव्हा विरोधकांचं त्यावर लक्ष गेलं.

एवढी गुप्तता कशासाठी पाळण्यात आली? यातून निर्माण झालेले प्रश्न सरकारच्या हेतूवर गंभीर प्रश्नचिन्ह उपस्थित करतात. संविधानाच्या सातव्या अनुसूचीनुसार टेलिकॉम आणि डिजिटलचा विषय केंद्र सरकारचा असला, तरी सायबर सिक्युरिटी, सायबर क्राइमचा विषय राज्य सरकारच्या अखत्यारीत येतो. तेव्हा हे ॲप बंधनकारक करताना केंद्राला राज्य सरकारसोबत चर्चा करणं आवश्यक होतं. प्रत्यक्षात तसं झालेलं नाही. केंद्राकडं आधीच जनतेचा आधार क्रमांक, पॅन क्रमांक व इतर गोपनीय दस्तावेज असताना व देशात डेटा सिक्युरिटी ॲक्ट लागू नसताना जनतेच्या मान्यतेशिवाय त्यांचा पर्सनल डेटा घेणं हा एक गंभीर अपराध म्हणावा लागेल.

युजरला हे ॲप डिलिट करता येईल, असं केवळ तोंडी आश्वासन दिल्यानंतर नोटिफिकेशनमधील शब्द बदलणार नाहीत. त्यासाठी प्रत्यक्षात नोटिफिकेशनमध्येही दुरुस्ती होणं गरजेचं आहे. हे नोटिफिकेशन सध्या तरी आहे तसंच असल्यामुळं नव्या स्मार्टफोनच्या माध्यमातून हे ॲप घराघरांत तुमच्या, माझ्या स्मार्टफोनमध्ये येऊ शकतं. भविष्यात सॉफ्टवेअर अपडेटच्या माध्यमातून ॲक्सेसचे नियम बदलले जाऊ शकतात. त्यामुळं स्मार्टफोन युजरच्या गोपनीयतेला धक्का लागण्याचा धोका अजून टळलेला नाहीय. म्हणूनच ही स्मार्ट हेरगिरी रोखण्यासाठी आपण सतर्क राहायला हवं.

# ‘बिग ब्रदर’चा डिजिटल अवतार



**तंत्रज्ञानाच्या नावाखाली नागरिकांच्या खिशातच सरकारी खिडकी बसवण्याचा निर्णय, भारताला ऑरवेलच्या ‘१९८४’च्या सावलीत नेतोय का, हा प्रश्न समोर आलाय. ‘संचार साथी’चे अनिवार्य हे अस्तित्वातील सुरक्षिततेपेक्षा अधिक पाळत आणि नियंत्रणाची भीती निर्माण करणारे आहे.**

‘Big Brother is watching you.’ हे जॉर्ज ऑरवेलच्या ‘१९८४’ या जगप्रसिद्ध कादंबरीतील गाजलेले वाक्य आज पुन्हा कानात घुमू लागले आहे. पाळत, नियंत्रण आणि खासगी आयुष्याचा गळा घोटणारी सत्ता ही कधीकाळी फक्त कादंबरीतील दुनिया वाटायची. पण तंत्रज्ञान सत्तेच्या हातात गेले की, कल्पना वास्तवात उतरताना दिसते. आज भारतात हीच परिस्थिती प्रत्यक्षात आली आहे. आता देशात विकल्या जाणाऱ्या प्रत्येक नवीन स्मार्टफोनमध्ये ‘संचार साथी’ हे सरकारी ॲप आधीच डाऊनलोड केलेले आणि जुन्या फोनमध्ये अपडेटच्या माध्यमातून ते डाऊनलोड केले जाणार आहे. हे ॲप नागरिकांना काढूनही टाकता येणार नाही किंवा बंद करता येणार नाही, असा निर्णय केंद्र सरकारने घेतला आहे. हा केवळ तांत्रिक आदेश नाही; हा आपल्या डिजिटल आयुष्याची दिशा ठरवणारा निर्णय आहे. ‘संचार साथी’ या ॲपचा वरकरणी उद्देश डिजिटल सुरक्षा आणि फसवणुकीला प्रतिबंध आहे. पण त्याच्या परवानग्या, त्याची माहिती गोळा करण्याची क्षमता आणि त्याचे अनिवार्य स्वरूप पाहिले की, हा सुरक्षा उपाय आहे की नागरिकांवर पाळत ठेवण्याचे सरकारी साधन आहे, असा प्रश्न पडल्याशिवाय राहत नाही?

### व्यक्तिगत फोनमध्ये सरकारी खिडकी?

स्मार्टफोन हा नागरिकांच्या जीवनाचा अविभाज्य घटक आहे. कॉल्स, मेसेजेस, लोकेशन, ब्राऊजिंग, बँकिंग यासह त्याचे संपूर्ण वैयक्तिक आयुष्य त्यात साठवलेले असते. अशा डिव्हाइसमध्ये सरकारनेच एक कायमस्वरूपी खिडकी बसवावी आणि ती बंद करण्याचा हक्क नागरिकांना नसावा, हे लोकशाही राज्यव्यवस्थेला शोभणारे नाही. ‘संचार साथी’ ॲप कोणते डेटा-पॉइंट्स गोळा करू शकते हे पाहिले तर त्यात लोकेशन, फोटो, व्हिडीओ, कॉन्टॅक्ट, सिम माहिती, डिव्हाइस आयडी, नेटवर्क ॲक्टिव्हिटी, कॉल-संबंधित मेटाडेटा यांचा समावेश आहे. आधार-मोबाईल-बँक या आधीच साखळीने जोडलेल्या व्यवस्थेत हे एक नवे पाळत ठेवणारे हत्यार ठरते. डिजिटल पर्सनल डेटा प्रोटेक्शन कायद्याने सरकारला दिलेले अमर्याद अधिकार, त्यात ‘राष्ट्रीय हित’, राष्ट्रीय सुरक्षा, परराष्ट्र संबंध, आपत्ती व्यवस्थापन, गुन्हे तपास या अमर्यादित श्रेणी आणि त्यावर कोणताही प्रभावी स्वतंत्र रेग्युलेटर नसणे; यामुळे नागरिकांचा डेटा कोणत्या उद्देशासाठी वापरला जाईल, यावर कुठलेही नियंत्रण राहत नाही. लोकशाहीत सरकार नागरिकांवर विश्वास ठेवते. हुकूमशाहीत नागरिकांना सरकारवर विश्वास ठेवावा लागतो आणि सरकार नागरिकांवर पाळत ठेवते. यावरून भारताची वाटचाल कोणत्या दिशेने सुरू आहे स्पष्ट होते?

### डिजिटल हेरगिरीचा इतिहास आणि वर्तमान

या सरकारचा ह्यडिजिटल हेरगिरीह्वचा इतिहास नवीन नाही. नागरिकांच्या खासगीपणाला मूलभूत अधिकार म्हणून मान्यता देण्यास सरकारने विरोध केला. १० केंद्रीय एजन्सींना न्यायालयीन परवानगीशिवाय डेटा इंटरसेप्शनचे अधिकार दिले. डीएनए प्रोफाइलिंग बिल, सोशल मीडिया हब प्रकल्प, नमो ॲपचा डेटा परदेशात जाण्याचा आरोप आणि सर्वात महत्त्वाचे पेगासस स्पायवेअरचा वापर. पत्रकार, न्यायाधीश, निवडणूक अधिकारी, विरोधी पक्षांचे महत्त्वाचे नेते यांच्यावर पेगाससच्या माध्यमातून पाळत ठेवल्याचा आरोप आणि आता प्रत्येक फोनमध्ये सरकारी ॲप अनिवार्य ठेवण्याचा निर्णय हा त्याचे पुढचे पाऊल आहे.

भीमा-कोरेगाव प्रकरणात, सामाजिक कार्यकर्त्यांच्या संगणकात बाहेरून फाइल्स ‘प्लांट’ केल्या गेल्याचे आंतरराष्ट्रीय तपास यंत्रणांनी केलेल्या तपासात स्पष्ट झाले. पण याच खोट्या पुराव्याच्या आधारे अनेकांना चार-पाच वर्षे जेलमध्ये डांबण्यात आले होते. या पार्श्वभूमीवर सरकारकडून मोबाईलमध्ये डाऊनलोड करण्यात येणाऱ्या कोणत्याही अनिवार्य ॲपवर नागरिकांनी विश्वास कसा ठेवावा.

### ‘गुगल डेटा घेतं’ हा युक्तिवाद चुकीचा का?

सत्ताधाऱ्यांचा नागरिकांवर पाळत ठेवण्याच्या प्रकल्पाचे समर्थक ‘गुगल’ तर डेटा घेतं. मग संचार साथीने डेटा घेतला तर काय अडचण आहे, असे प्रश्न विचारतात. पण गुगल तुम्हाला अटक करू शकत नाही. गुगल तुमच्या फोनमधील माहिती राजकीय कायार्साठी वापरू शकत नाही. शासन संस्था मात्र कायद्याच्या जोरावर तुमचे जगणे मुश्किल करू शकते. तुमच्या डेटाचा वापर राजकीय फायद्यासाठी करत विरोधकांची चौकशी, खटले भरू शकते, कोणावरही दबाव आणू शकते. नागरिकांना सतत या भीतीच्या सावटाखाली, दहशतीखाली राहावे लागेल, हे अत्यंत धोकादायक आहे.

### घर-घर ते हर मोबाईल आणि मोदी

२०१४ मध्ये ‘घर-घर मोदी’ हा प्रचार नारा होता. त्यानंतर पेट्रोल पंप वितरणापासून कोविडच्या लसीचे सर्टिफिकेट ते थेट शेतीसाठी आवश्यक असणाऱ्या खतांच्या गोण्यांपर्यंत, सकाळी उठल्यापासून रात्री झोपेपर्यंत दररोज विविध ठिकाणी नागरिकांना मोदींच्या फोटोचे दर्शन घडतच असते. आता त्याचे डिजिटल रूप म्हणजे प्रत्येक मोबाईलमध्ये संचार साथीच्या रूपाने होणार आहे. हा ‘साथी’ नसून डिजिटल हेर नागरिकांच्या आयुष्यात घुसवण्याचा प्रयत्न आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी गुजरातचे मुख्यमंत्री असताना त्यांच्या कार्यकाळात हेरगिरी झाल्याच्या आरोपांची बरीच चर्चा झाली. संचार साथीच्या रूपाने सुरू होणारी ही निगराणी केवळ तांत्रिक नाही; ती राजकीय नियंत्रणाची रणनीती आहे.

### सरकार गोपनीय, नागरिक पारदर्शक

नरेंद्र मोदी यांचे सरकार इतिहासातील सर्वात गोपनीय पद्धतीने काम करणारे सरकार आहे. या सरकारने माहिती अधिकार कायद्यात दुरुस्ती करून तो कमजोर केला. सरकार गोपनीयतेच्या नावाखाली इलेक्टोरल बाँड, पीएम केअर फंडाच्या माध्यमातून मिळालेल्या देणग्यांची माहिती देत नाही. राष्ट्रीय सुरक्षेचे नाव पुढे करून राफेल विमान खरेदीची माहिती लपवते. पंतप्रधानांच्या शैक्षणिक पदवीची माहिती गोपनीय ठेवते. पण त्याच सरकारला नागरिकांची सर्व माहिती हवी आहे. नागरिकांच्या फोनमधील फोटो, लोकेशन, चॅट्स, बँक डिटेल्स माहितीवर सरकारला नियंत्रण का ठेवायचे आहे.

### डिजिटल सुविधा की बेड्या?

युरोपियन युनियनमध्ये नागरिकांना त्यांच्या डेटावर पूर्ण हक्क आहे. कोणता डेटा गोळा होतो? तो कसा वापरला जातो? तो मिटवण्याचा हक्क इत्यादी. चीनमध्ये सरकारी निगराणीची प्रणाली सर्वव्यापी आहे. क्रेडिट स्कोअर, फेशियल रिकग्निशन, सतत मॉनिटरिंग या दोन मॉडेलपैकी भारत कोणत्या दिशेने वळतोय? डिजिटल सुविधा देणे आणि डिजिटल बेड्या लादणे वेगवेगळे आहे. पण सरकार या दोन्ही गोष्टीतले अंतर पुसून काढत डिजिटल सुविधांच्या माध्यमातून नागरिकांना बेड्यांत अडकवण्याचा प्रयत्न करत आहे.

### ऑरवेलची छाया तुमच्या मोबाईलवर

जॉर्ज ऑरवेलने कल्पना केलेला ‘टेलिस्कोप’ भिंतीवर होता. आता तो मोबाईलच्या रूपात नागरिकांच्या खिशात आहे. प्रीलोडेड-नॉन-डिलिटेबल सरकारी ॲप हा फक्त तांत्रिक निर्णय नाही; तो लोकशाहीतील व्यक्तिस्वातंत्र्याच्या मूलभूत अधिकारावर प्रहार आहे. सरकार स्वतः पारदर्शकतेपासून पळ काढते, पण नागरिकांवर सर्वदिशांनी नजर ठेवू पाहते.

आजचा सर्वात महत्त्वाचा प्रश्न आहे. ‘Big Brother is watching you.’ ही ओशिनियाची कथा आहे की भारताची? लोकशाही निगराणीवर नव्हे तर विश्वासावर टिकते. ही डिजिटल हेरगिरी सामान्य झाली तर लोकशाही असामान्य होईल. १५ ऑगस्ट १९४७ रोजी मिळवलेले स्वातंत्र्य टिकवण्यासाठी सातत्याने संघर्ष करावा लागणार आहे. नागरिकांनी आजच या हेरगिरीच्या मोहिमेविरुद्ध आवाज उठवण्याची गरज आहे. कारण उद्या कदाचित उशीर झाला असेल.

# क्षमा

क्षमा करणे किंवा क्षमा मागणे यामुळे शुद्धतेचा प्रवास सुरू होतो. पण सर्वसाधारणपणे माणूस क्षमा मागत नाही. मी का क्षमा मागू, असे प्रश्नचिन्ह घेऊन तो वावरत असतो. खरेतर या मागे माणसाचा अहंभाव दडलेला आहे. हा अहंभाव म्हणजेच ज्ञानाला नकार आहे. हा अहंभाव म्हणजेच शुद्धतेकडे जाण्याचा अवरोध आहे. त्यामुळे शुद्धतेकडे जायचे असेल तर क्षमा मागता येणे आणि क्षमा करता येणे या दोन बाबी अत्यंत महत्त्वाच्या आहेत. या दोन्ही प्रक्रिया सहज पद्धतीच्या अंगवळणी पडल्यामुळे प्रत्येक वेळेला काही लोक अनावश्यक पद्धतीने क्षमा मागतात. म्हणजेच 'सॉरी हं' अशा पद्धतीचा शब्दप्रयोग प्रत्येक वाक्यागणिक करत जातात. त्याचे स्वरूप अतिशय उथळ असते. क्षमा मागण्याची एक उथळ शैली अशीही आढळते की, लोक पान-तंबाखू खाऊन रस्त्यावर थुंकतात आणि कुणी ते निदर्शनास आणून दिले की, 'तुमच्या अंगावर थुंकी उडाली का?' असे विचारतात, किंवा 'सॉरी' म्हणून मोकळे होतात. क्षमा मागण्याची ही उथळ पद्धती ही विशुद्ध पद्धतीची नाही. एखाद्याच्या अंगावर थुंकी उडाली म्हणून क्षमा मागितली गेली, असे जरी असले तरी ज्या कारणामुळे, ज्या सेवनामुळे ही चूक झाली तो प्रमादच त्याला बाद करता यायला हवा. तशी चूक पुन्हा होऊच नये म्हणून त्याच्या मुळापर्यंत जाऊन त्याला क्षमा मागता यायला हवी, तरच ती क्षमा विशुद्धतेकडे जाणारी ठरते. एक व्यक्ती पानाचा तोबरा भरल्यानंतर रस्त्यावरती धुंकला. त्याचे शिंतोडे दुसऱ्या व्यक्तीच्या अंगावर उडाले. त्याने ते सांगताच अतिशय तटस्थपणाने' 'सॉरी सॉरी' म्हणून तो माणूस पुढे जाऊ लागला. ज्याच्या अंगावर शिंतोडे उडाले होते त्याने रागाने त्या जाणाऱ्या माणसाला थांबवून त्याच्या पाठीत एक गुद्दा लगावला व 'सॉरी हं' असे म्हणाला. अशा पद्धतीची क्रिया-प्रतिक्रिया या उथळ पद्धतीने क्षमा मागणाऱ्या आहेत. त्यातून शुद्धता गवसणे अवघडच! क्षमा मागणे ही भूमिका मुळापासून चित्ताला शुद्ध करणारी असली तरच त्यास महत्त्व असते.

# पनीर कटलेट

**साहित्य :** २०० ग्रॅम पनीर कुस्करून, २ मध्यम आकाराचे कांदे चिरून, १ गाजर किसून, १ वाटी बारीक चिरलेला कोबी, २ बटाटे उकडून कुस्करून, १ चमचा आले-लसूण पेस्ट, १ चमचा मिरची-कोथिंबीर पेस्ट, २ मोठे चमचे कॉर्नफ्लॉवर, गरजेनुसार मिठ, पाव ते अर्धा वाटी तेल, चाट मसाला.

**कृती :** भांड्यात तेल गरम करून त्यावर चिरलेला कांदा घाला. कांदा गुलाबी रंग येईपर्यंत शिजला की त्यावर



आले-लसूण पेस्ट व मिरची-कोथिंबीर पेस्ट घालून ढवळा. वरील मिश्रणावर कोबी, गाजर घालून २-३ मिनिटेच परतवत शिजवा. चायनीज पदार्थांसारखेच जास्त शिजू देऊ नका. आता कुस्करलेले बटाटे, मिठ घालून पुन्हा चांगले ढवळून लगेच गॅस बंद करा. हे मिश्रण एका ताटात पसरवा व जरा थंड होऊ द्या. मिश्रण थंड झाले की त्यात पनीर व कॉर्नफ्लॉवर टाकून मिश्रण एकजीव करा. आता तुम्हाला हव्या त्या आकाराचे कटलेट करा. व नॉनस्टिक पॅनवर जरासेच तेल घालून शॅलो फ्राय करून घ्या. दोन्ही बाजू मध्यम आचेवर साधारण ५-६ मिनिटे शिजवा. कटलेट तयार झाले की गरम असतानाच त्यावर चाट मसाला टाका. नुसते किंवा सॉस किंवा पुदिना चटणीबरोबर याचा आस्वाद घ्या.

**अधिक टिप :**

- **या कटलेटमध्ये इतर कोणतेही मसाले न वापरल्याने पनीर व भाज्यांचा अस्सल स्वाद येतो.**
- **लहान मुलांना तर खूपच आवडतात. शिवाय कोबीसारखी भाजी खाल्ली जाते.**
- **यात अजून कांद्याची पात, किंवा आपल्या आवडीच्या भाज्या थोड्या प्रमाणावर घालू शकता.**

# न्यूड मेकअप लूकसाठी काही टिप्स



**न्यूड मेकअप लूकचा सध्या खूपच वापर केला जातो. यासाठी ब्लॅक मस्कराचा वापर करा. आपल्याला त्वचेला सूट होईल असा नैसर्गिक रंग आणि गुलाबी रंगाच्या लिप कलरचा वापर करा. आकर्षक दिसण्यासाठी न्यूड मेकअप लूकसाठी कोणत्या टिप्सचा वापर केला पाहिजे, ते जाणून घ्या.**

- आपल्या डोळ्यांना नॅचरल लूक देण्यासाठी पापण्यांना ब्लॅक मस्करा लावा आणि केस कुरळे करा.
- डोळ्यावरच्या आतील कोपऱ्यापर्यंत काजळ लावा. त्यामुळे पापण्या सुंदर आणि आकर्षक दिसतील.
- गालावर नॅचरल चमक येण्यासाठी चीकबोन्सला हायलाइट करा. सध्या न्यूड मेकअप लूकसाठी आपल्या त्वचेला सूट होईल अशा नॅचरल शेडची निवड करा.
- यासाठी हलक्या रंगाचा वापर करा. चेहरा चमकण्यासाठी ओठांना हलक्या गुलाबी रंगाची पिंक शेडची लिपस्टिक लावून त्यावर शाईन येण्यासाठी लिप ग्लॉसचा वापर करा. त्यामुळे अजूनच आकर्षक लूक येईल.
- न्यूड मेकअप लूकसाठी एकाच रंगाच्या वेगवेगळ्या शेड्सचा वापर करा.
- न्यूड शेड्स लावण्याआधी लाईट बेस लावा आणि आवश्यक असल्यास हलक्या हातांनी लूज पावडर किंवा कॉम्पॅक्ट पावडर लावा.

# गरम पाणी पिण्याचे फायदे

**बहुतेक लोक आपल्या दिवसाची सुरुवात चहा किंवा कॉफीच्या गरमागरम कपाने करत असतात. काही लोकांना तर सकाळी उठल्या उठल्या चहा किंवा कॉफी मिळाली नाही, तर त्यांचा अख्खा दिवस वाईट जातो, इतकी त्यांना चहा किंवा कॉफीची सवय झालेली असते. पण या सवयीमुळे कालांतराने बद्धकोष्ठ, पोटदुखी, ॲसिडिटी, पिंपल्स अशा तक्रारी सुरू होतात. असे म्हटले जाते की त्वचा, केस आणि एकंदर शरीराचे आरोग्य सांभाळण्यासाठी भरपूर पाणी पिणे आवश्यक आहे. त्याचबरोबर सकाळी उठल्या उठल्या एक ग्लास गरम पाणी पिण्याची सवयही तुमच्या शरीरातील अनेक विकार मुळापासून दूर करू शकते.**

**सकाळी** उठून नियमितपणे एक ग्लास गरम पाणी प्यायल्याने पचन शक्ती चांगली राहते. तसेच गरम पाणी प्यायल्याने शरीरातील रक्ताभिसरणही चांगले राहते. आपल्या खाण्या-पिण्याच्या अयोग्य सवयींमुळे आपल्या शरीरामध्ये साठत असलेले घातक पदार्थ गरम पाण्याच्या सेवनामुळे बाहेर टाकण्यास मदत होते. तसेच गरम पाण्याच्या नियमित सेवनामुळे शरीरातील अतिरिक्त चरबी घटण्यास मदत होऊन वजन कमी होण्यास मदत होते. योगशास्त्राच्या नियमानुसार तीन महिने गरम पाण्याच्या सेवनाने वजन कमी होऊ शकते. याकरिता इतर कोणतीही विशेष पथ्ये पाळण्याची गरज नाही.

काही लोकांना बद्धकोष्ठाचा त्रास होतो. अशा वेळी सकाळी रिकाम्यापोटी गरम पाणी पिणे फायदेशीर ठरू शकते. पुष्कळ महिलांना मासिक धर्माच्या दिवसांमध्ये डोकेदुखी सतावते. त्यावेळी नियमित गरम पाण्याचे सेवन केल्याने डोकेदुखीपासून आराम मिळतो. तसेच या



दिवसांमध्ये होणारी पोटदुखी ही गरम पाण्याच्या सेवनामुळे कमी होते.

दररोज सकाळी एक ग्लास गरम पाण्यामध्ये थोडासा लिंबाचा रस घालून प्यायल्याने शरीराची रोगप्रतिकारशक्ती वाढते. ज्यांना सतत बारीकसारीक तब्येतीच्या तक्रारी जाणवत असतील त्यांनी गरम पाणी आणि लिंबाच्या रसाचे दररोज सेवन करणे उत्तम. यामुळे त्वचेचे आरोग्य देखील चांगले राहून, त्वचेवर पिंपल्स येणे कमी होते. तसेच गरम पाण्याच्या सेवनाने ॲसिडिटीचा त्रासही कमी होतो. पुष्कळ लोकांच्या खाण्या-पिण्याचे वेळापत्रक किंवा झोपेच्या वेळा अतिशय अनियमित असतात. शिवाय ज्या लोकांना काही ना काही कारणाने सतत प्रवास करावा लागतो. त्यांनाही बाहेरच्या जेवणावरच काम चालवून घ्यावे लागते. परिणामी ॲसिडिटीसारखे विकार पाठीमागे लागतात. अशा वेळी दररोज सकाळी गरम पाणी पिण्याच्या सवयीने ॲसिडिटीचे प्रमाण कमी होते.

# मासिक पाळी पुढे ढकलताय ?

**सण, समारंभ, पर्यटन किंवा धार्मिक कार्याच्या आड येणारी मासिक पाळी पुढे ढकलण्याचा निर्णय अनेक महिला घेतात. मात्र अशा प्रकारे निसर्गचक्रात हस्तक्षेप करणं चुकीचं आहे. बरंच प्रबोधन होऊनही मासिक पाळीबाबतचे गैरसमज कमी झालेले नाहीत. म्हणूनच महिलांना कृत्रिम पद्धतीने पाळी पुढे ढकलावी लागते. मासिक पाळी पुढे ढकलण्यासाठी गोळ्या घेतल्या जातात. पण या गोळ्यांचे शरीरावर दीर्घकालीन परिणाम होतात.**

- मासिक पाळी पुढे ढकलणाऱ्या गोळ्यांच्या सततच्या सेवनामुळे यासंदर्भातल्या नैसर्गिक चक्रावर परिणाम होऊ शकतो. शिवाय महिलांच्या प्रजननक्षमतेवरही याचे घातक परिणाम दिसून येतात.
- या गोळ्यांचं सेवन केल्यानंतर पुढचा काही काळ मासिक पाळीदरम्यान मोठ्या प्रमाणावर रक्तस्राव होण्याची शक्यता वाढते. जवळपास २० टक्के महिलांना हा अनुभव येतो. पुढचे काही महिने मासिक पाळीतून अधिक प्रमाणात रक्त जाऊ शकतं.
- या गोळ्या बऱ्याच काळपर्यंत घेत राहिल्यास आरोग्यावर अत्यंत घातक असे परिणाम दिसून येतात. नसांमध्ये रक्ताची गुठळी होण्यासारख्या समस्या जाणवू शकतात. या गोळ्यांमुळे इतर औषधांच्या शरीरावरच्या प्रभावावर विपरित परिणाम होऊ शकतो.
- या गोळ्या घेतल्यानंतर इतर काही दुष्परिणाम होऊ शकतात. जुलाब, हातापायांमध्ये गोळे येणं, अवेळी रक्तस्राव होणं हे दुष्परिणाम दिसून येऊ शकतात.



# कोरफडीचे ५ गुणकारी फायदे

**कोरफड त्वचेसाठी खूप फायदेशीर आहे. याच्या नियमित सेवनाने त्वचेसंबंधित अनेक समस्या दूर होतात. जाणून घ्या कोरफडीचे गुणकारी फायदे...**

- सतत कॉम्प्युटरसमोर बसल्याने डोळ्यांवर ताण येतो. डोळ्यांचे आरोग्य चांगले राहाण्यासाठी दोन चमचे कोरफडीचा गर एक कप पाण्यात मिसळून त्याने डोळे धुवा. यामुळे डोळ्यांना आराम मिळेल.
- चेहऱ्यावर पुटकुळ्या आल्यास कोरफडीचा गर चेहऱ्यावर लावा. थोड्या वेळाने चेहरा साध्या पाण्याने धुवा. यामुळे पुटकुळ्या कमी होतील.
- शरीरावर कापल्यामुळे जखम झाली असल्यास त्यावर कोरफडीचा गर लावा.
- कोंड्याची समस्या असल्यास दोन चमचे कोरफडीचा गर कंडिशनरसोबत मिसळा. यामुळे कोंड्यापासून सुटका होईल.
- दातांच्या हिरड्या मजबूत करण्यासाठी हिरड्यांवर कोरफडीचा गर लावा.

# जाणून घ्या टिकली लावल्याने होणारे फायदे



**टिकलीचाही महिलांच्या १६ शृंगारांमध्ये समावेश असून सौभाग्यवती महिला काही वर्षांपूर्वी कुंकवाचा वापर करत असत. पण कुंकवाचा वापर न करता टिकलीचा वापर सध्या महिलावर्ग मोठ्या प्रमाणात करताना पाहायला मिळतात. महिला चेहऱ्यावर लावण्यात आलेल्या टिकलीमुळे केवळ सुंदरच दिसत नाहीत तर त्याचे अनेक आरोग्यदायी फायदेही आहेत. टिकलीचा वापर सामान्यतः महिला ट्रेडिशनल लूकसाठी करतात. पण एका अभ्यासानुसार आरोग्यालाही टिकलीमुळे अनेक फायदे होतात. यामुळेच टिकलीचा वापर अनेक महिला करत आहेत. एवढेच नाही तर वेस्टर्न कपडे परिधान करणाऱ्या महिलाही आपल्या ड्रेसनुसार कलरफुल टिकली वापरण्यास सुरुवात करत आहेत. चेहऱ्यावरील टिकलीमुळे महिला खुपच सुंदर दिसतात आणि त्यामुळे अनेक आरोग्यदायी फायदेही होतात. कपाळावर टिकली लावण्याने अनेक फायदे होतात.**

**कपाळावर** टिकली लावल्यामुळे डोके दुखणे बंद होते. ॲक्युप्रेशर शास्त्रानुसार कपाळावर ज्या ठिकाणी टिकली लावण्यात येते, त्या जागेवर मसाज केल्यास डोकेदुखी तत्काळ बंद होते. टिकली लावलेल्या जागेवर मसाज केल्यास नाकाच्या आसपास ब्लड सर्क्युलेशन चांगल्या पद्धतीने होण्यास सुरुवात होते, ज्यामुळे तुम्हाला खूपच आराम मिळतो.

टिकली दोन्ही भुवयांच्या मध्यभागी ज्या ठिकाणी लावली जाते, शरीरातील सर्व नसा त्याच केंद्रावर एकत्र येतात. टिकली लावण्यात येणाऱ्या या जागेला अग्निचक्र या नावाने सुद्धा ओळखले जाते. म्हणूनच टिकली लावल्याने एकाग्रताही वाढते आणि मन शांत राहते. तसेच, टिकली लावल्याने ताणतणावही कमी होतो.

तुम्हाला पूर्ण झोप मिळत नाही आणि त्यामुळे तुम्ही त्रस्त आहात तर टिकली लावणे तुमच्यासाठी खूपच फायदेशीर होऊ शकते. टिकली शरीरच्या वरच्या भागाला शांत ठेवण्यासाठी खूपच फायदेशीर ठरते. कपाळावर टिकली लावल्याने चांगली झोप येते.

टिकली डोळ्यांच्या नसा मजबूत करण्यास खूपच मदत करते. टिकली कपाळ्याच्या मध्यभागी ज्या ठिकाणी लावली जाते, त्या ठिकाणच्या नसा आणि डोळ्यांमधील नसा यांच्यात एक कनेक्शन असते. टिकली डोळ्यांच्या नसांना मजबूत करण्यास मदत करते ज्यामुळे तुम्हाला एकदम स्पष्ट आणि साफ दिसण्यास मदत होते. एवढेच नाही तर टिकली लावल्याने आसपासचे मसल्स मजबूत आणि हेल्दी होतात.



तुमच्या चेहऱ्यावर जर सुरकुत्या पडण्यास सुरुवात होत आहे तर टिकली लावण्यास तुम्ही सुरुवात करा. कारण, टिकली लावल्याने चेहऱ्यावर येणाऱ्या सुरकुत्यांपासून सुटका मिळण्यास मदत होते.

# बदलत्या वातावरणातील आजार टाळण्यासाठी करा घरगुती उपाय

**सतत बदलत्या हवामानामुळे साथीचे रोग पसरत आहेत. मुंबईत नेहमीप्रमाणे यंदाही पावसाळ्यात साथीचे रोग पसरण्यास सुरुवात झाली असून अनेक मुंबईकर यामुळे आजारी पडले आहेत. मुंबई महापालिकेच्या आणि खासगी रुग्णालयांमध्ये सध्या साथीच्या रोगांमुळे आजारी पडलेल्या रुग्णांची गर्दी दिसून येत आहे. त्यामुळे तुम्ही हे घरगुती उपाय नक्की करून पहा.**



**आले :** सर्दी खोकल्यावरील गुणकारी औषध म्हणून प्रचलित आहे. आल्याचा रस व मध सम प्रमाणात बाटलीमध्ये साठवून दोन-दोन चमचे दोन वेळा घेतल्यास सर्दी, खोकला, पडसे आणि स्वरभंग बरे होतात. अजीर्ण झाल्यास आल्याच्या रसात लिंबाचा रस व मीठ घालून पाणी प्यावे. आले तोंडात ठेवताच लाळग्रंथी सक्रिय होतात.

**तुळस :** ताप आल्यावर तुळशीचा रस पायल्यानंतर ताप कमी होतो. मलेरिया आणि डेंग्यू झाल्यानंतरही तुळशीचा रस प्यायल्यावर आराम मिळतो. रोग प्रतिकारशक्ती वाढवण्यासाठी आणि वार्धक्य कमी करण्यासाठी तुळशीचा रस प्यायल्याने फायदा मिळेल. तुळशीमध्ये इगेनॉल हे द्रव्य असल्याने मधुमेह रोगावर नियंत्रण मिळवण्यासाठी ही फायदा होतो. आताच्या बदलत्या वातावरणात बाहेरचे पदार्थ खाणे शक्यतो टाळा. त्याचप्रमाणे वेळेत डॉक्टरांचा सल्ला घ्यायला मात्र विसरू नका.

# चेहऱ्यावरून अकाली प्रौढत्वाच्या खुणा नाहीशा करण्यासाठी आजमावा हे उपाय



**चाळिशी उलटून गेल्यानंतर चेहऱ्यावर दिसू लागणाऱ्या प्रौढत्वाच्या खुणा आजकालच्या काळामध्ये ऐन विशीमध्येच काहींच्या चेहऱ्यांवर दिसून येतात. अयोग्य, असंतुलित आहार, व्यायामाचा अभाव, तणावपूर्ण जीवनशैली, सौंदर्यप्रसाधनांचा सातत्याने वापर, सतत उन्हामध्ये त्वचेवर येणारे काळसर डाग, यामुळे ऐन पंचविशीतील तरुण-तरुणी चाळिशी पार केल्यासारखे दिसू लागतात. चेहऱ्यावर पिग्मेंटेशन दिसू लागते, बारीक सुरकुत्या पडू लागतात, त्वचा निस्तेज, कोरडी दिसायला लागून, ढिली पडून लटकूही लागते. या सर्व गोष्टींमुळे चेहरा अनाकर्षक दिसू लागतो. या सर्व समस्या टाळून चेहऱ्यावरून अकाली प्रौढत्वाच्या खुणा नाहीशा करण्यासाठी काही नैसर्गिक उपाय आजमावता येऊ शकतात.**

**अननस :** चेहऱ्यावरील त्वचा ढिली पडून अनेक ठिकाणी लटकल्याप्रमाणे दिसू लागते. त्वचा पुन्हा 'firm' बनवण्यासाठी अननसाचा वापर हा चांगला पर्याय ठरतो. अननसाचा वापर करण्यासाठी अननसाची साले काढून टाकावीत. अननसाच्या गराचे बारीक तुकडे करून घेऊन हे तुकडे चेहऱ्यावरून हळुवार हाताने फिरवावेत, अथवा अननसाचा गर पिळून रस काढून घ्यावा आणि हा रस चेहऱ्यावर लावावा. हा रस काही वेळ चेहऱ्यावर राहू देऊन त्यानंतर थंड पाण्याने चेहरा स्वच्छ धुवावा. हा उपाय काही दिवस दररोज करावा.

अननसाचा रस नैसर्गिक 'astringent' असल्याने ढिली पडलेली त्वचा पुन्हा कसण्यास हा रस अतिशय उपयुक्त ठरतो. हा उपाय अवलंबायचा झाल्यास आपण वापरणार असलेले अननस ताजे आणि पिकलेले असल्याची खात्री करून घ्यावी. तसेच अननसाचा रस आधी मनगटाच्या आतील बाजूला लावून पाहावा आणि काही वेळ वाट पहावी. या रसामुळे कोणत्याही प्रकारची ॲलर्जी नसल्याची खात्री पटल्यानंतरच हा रस चेहऱ्यावर लावावा.



**आहार :** आपल्या आहारामध्ये सुका मेवा, तेलबिया, अंडी, मासे, डाळी, मटार, शेंगभाज्या, ताजी फळे, टोमॅटो, हिरव्या पालेभाज्या इत्यादी पोषक अन्नपदार्थांचा समावेश असेल याची काळजी घ्यावी. आपल्या आहारामध्ये तळलेले पदार्थ, प्रोसेस्ड अन्नपदार्थ, अल्कोहोल, कार्बोनेटेड किंवा कॅफिनेटेड पेये, साखरेचे प्रमाण जास्त असल्यास त्यामुळे त्वचेच्या नव्या पेशी तयार होण्यामध्ये अडचण येत असते. त्यामुळे अशा पदार्थांचे सेवन आपल्या आहारामध्ये अतिशय मर्यादित असावे.



**कोरफड :** ॅहेऱ्यावरील अकाली प्रौढत्वाच्या खुणा नाहीशा करण्यासाठी कोरफडीचा ताजा गर वापरावा. कोरफडीच्या ताज्या गरामध्ये गुलाबजल घालून पेस्ट तयार करावी. ही पेस्ट चेहऱ्यावर लावून हलक्या हाताने मालिश करावी. ही पेस्ट चेहऱ्यावर वीस मिनिटे राहू देऊन यानंतर थंड पाण्याने चेहरा धुवून टाकावा. कोरफडीचा गर आणि गुलाबजल मिसळून तयार केलेल्या पेस्टमुळे चेहऱ्यावरील सुरकुत्या नाहीशा होण्यास मदत होते. कोरफडीमुळे चेहऱ्यावरील टिश्यू रिपेअर होण्यास मदत होऊन त्वचा तजेलदार दिसू लागते. कोरफडीप्रमाणे टी ट्री ऑइल आणि ऑलिव्ह ऑइल यांचे मिश्रणही चेहऱ्यावरील सुरकुत्या कमी करून त्वचा तजेलदार बनण्यास सहाय्यक आहे.

**टी ट्री - ऑलिव्ह ऑइल :** एक लहान चमचा टी ट्री ऑइल, एक मोठा चमचा ऑलिव्ह ऑइलमध्ये मिसळून याने रात्री झोपण्यापूर्वी चेहऱ्यावर मालिश करावी. हे तेल रात्रभर चेहऱ्यावर राहू देऊन सकाळी चेहरा थंड पाण्याने धुवावा.

# सात फायदे लसूण आणि मध एकत्र मिक्स करून खाण्याचे...

**लसूण मसालेदार खाण्याचे स्वाद वाढवतो. तसेच याचे गुणकारी आणि आरोग्यदायी फायदे खूप आहेत. लसूण आणि मध एकत्र मिक्स केल्याने आरोग्याचा खूप मोठा खजिना तुमच्याकडे येतो. असे केल्याने सौंदर्यासंबंधी समस्या दूर होऊ शरीर डिटॉक्स करण्यासाठी खूप मदत करतो. तसेच इन्फेक्शनही संपवतो. अशात मध आणि लसूण खाल्ल्यास सात फायदे होतात.**

**हृदयाला निरोगी ठेवतो :** लसूण आणि मध यांचे मिश्रण खायाने हृदयाकडे जाणाऱ्या धमण्यांमधील ब्लॉकेजेस निघून जातात. यामुळे ब्लड सर्क्युलेशन योग्य प्रकारे हृदयापर्यंत पोहोचते.



**सर्दी आणि पडसं दूर करते :** हे मिश्रण खाल्ल्याने सर्दी आणि पडशासह सायनसचा प्रॉब्लेम खूप कमी होतो. हे मिश्रण शरीरातील उष्णता वाढवते. आजारांना दूर ठेवते.

**इम्युन सिस्टीमला मजबूत करते :** लसूण आणि मधाच्या मिश्रणाने तुमची इम्युन सिस्टिम मजबूत होते. यामुळे तुम्ही प्रत्येक ऋतूमध्ये तंदुरुस्त राहू शकता.

**डायरियापासून बचाव :** कोणाला किंवा लहान मुलांना सतत डायरियाचा त्रास होत असेल तर त्यांना हे मिश्रण खाऊ घाला. त्यांची पचन संस्था दुरुस्त होईल. तसेच पोटातील इन्फेक्शन दूर होईल.

**डिटॉक्स :** हे एक नैसर्गिक डिटॉक्स मिश्रण आहे. हे खाल्ल्याने शरीरातील घाण आणि वेस्ट मटेरियल बाहेर पडते.

**फंगल इन्फेक्शन :** फंगल इन्फेशन, शरीराच्या कोणत्याही भागावर हल्ला करत असेल तर ॲण्टी बॅक्टेरियल गुणांचे हे मिश्रण त्या ठिकाणी लावल्यास बॅक्टेरिया दूर होतात. शरीर कमजोर होण्यापासून वाचते.

**घशाच्या इन्फेक्शनमध्ये लाभदायक :** हे मिश्रण घशातील संक्रमण दूर करते. यात ॲण्टी इन्फ्लेमेटरी गुण आहे. घशातील खरखर आणि सूज कमी करण्यास मदत करते.

# साखरेच्या ऐवजी मिठाई बनवताना वापरा खजुराची पेस्ट

**आपल्या दैनंदिन आहारामध्ये साखरेचा वापर होत असतो. चहा, कॉफी आणि मुख्य म्हणजे आपल्या आहारातील बहुतेक सर्वच गोड पदार्थांमध्ये साखरेचा वापर नियमित केला जात असतो. केवळ घरी तयार करण्यात आलेल्या पदार्थांतच नव्हे, तर ब्रेड, बिस्किटे, तयार सॉसेस, सँडविच स्प्रेड्स, पॅकेज्ड फळांचे रस, कोल्ड ड्रिंक्स यामध्येही साखरेचे प्रमाण जास्त असते.**

**रिफाइंड** साखर अतिप्रमाणात खाल्ल्याने आरोग्याला धोका निर्माण होत असून, तरुण वयातच उच्च रक्तदाब, मधुमेह इत्यादी विकार उद्भवण्याचे प्रमाण वाढले आहे. आहारामध्ये साखर जास्त असल्याने चेहऱ्यावर अकाली सुरकुत्या येणे, वारंवार मुरुमे, पुटकुळ्या येणे इत्यादी लक्षणे दिसू लागतात. त्यामुळेच आहारतज्ज्ञ दैनंदिन आहारामधून साखरेचे प्रमाण कमी करून साखरेच्या ऐवजी नैसर्गिक स्वीटनर्स वापरण्याचा सल्ला देत असतात. नैसर्गिक स्वीटनर्समध्ये अनेक पर्याय उपलब्ध असून त्यामध्ये खजुराच्या पेस्टचा समावेश करता येऊ शकतो.

खजुराची विशेषतः अशी की, त्यामध्ये नैसर्गिक शुगर्ससोबत प्रथिने, फायबर, झिंक, मॅग्नेशियम इत्यादी क्षारही आहेत.

शंभर ग्राम खजुरामध्ये २८२ किलो कॅलरीज इतकी ऊर्जा असते. त्यामुळे खजुरापासून तयार केली गेलेली पेस्ट किंवा सिरप रिफाईन्ड साखरेच्या ऐवजी वापरले जाऊ शकते.



खजुराची पेस्ट घरच्या घरी तयार करण्यासाठी केवळ खजूर आणि स्वच्छ पाणी, इतक्याच साहित्याची आवश्यकता आहे. खजुराची पेस्ट बनवण्यासाठी ताजा पिकलेला खजूर पाण्यामध्ये भिजवून ठेवावा. खजूर भिजवण्याआधी त्याच्यातील बिया काढून टाकाव्यात. त्यानंतर गरम पाण्यामध्ये खजूर भिजवावा. हा खजूर रात्रभर पाण्यामध्ये भिजू द्यायचा आहे.

दुसऱ्या दिवशी सकाळी खजूर पाण्यातून काढून घेऊन मिक्सरवर बारीक वाटावा. खजूर भिजवून ठेवलेले पाणी टाकून न देता हे पाणी खजूर मिक्सरवर वाटत असताना घालावे. आवश्यक तितके पाणी घालून आपल्याला हवी तितकी घट्ट किंवा पातळ पेस्ट तयार करून घ्यावी. या पेस्टमध्ये किंचित मीठ, आवडत असल्यास मध किंवा दालचिनीची पूड मिसळता येईल. यामुळे या पेस्टला आगळीच चव येते. खजुराचे सिरप तयार करण्यासाठी खजूर पाण्यामध्ये उकळून घ्यावेत. त्यानंतर खजूर उकळलेले पाणी गाळून घेऊन खजुराचा गर वेगळा करावा. गाळलेले पाणी पुन्हा उकळत ठेवून पाकाप्रमाणे दिसेपर्यंत आटवावे. तयार झालेले सिरप थंड झाल्यावर बाटलीमध्ये भरून ठेवावे. खजुराच्या सिरपपेक्षा खजुराची पेस्ट अधिक चांगली, कारण या पेस्टमध्ये फायबर असते.

# जिमला जाताय... तर लक्षात ठेवा

- जिम सुरू करण्याआधी आणि जिमिंग झाल्यानंतर लगेच पाणी किंवा ज्यूस पिणे टाळा.
- आपण किती कॅलरीज कमी करतोय किंवा घेतोय याचा हिशोब असू द्या.
- वजन कमी करण्यासाठी किंवा फिटनेससाठी लहान-लहान लक्ष्य निर्धारित करा.
- ट्रेनरचा सल्ला घेतल्याशिवाय दुसऱ्यांना पाहून कोणतीही नवीन मशीन ट्राय करू नका.
- जिमसाठी योग्य तेच कपडे आणि जोडे निवडा.
- जिममध्ये घाम पुसण्यासाठी नेहमी स्वच्छ नॅपकिन वापरा.
- कोणतीही मशीन वापरण्यासाठी नीट प्रशिक्षण घ्या आणि क्षमतेहून अधिक वर्कआऊट टाळा.
- एखाद्या व्यायामाने आपले अंग दुखत असेल किंवा स्नायू खेचले जात असतील तर लगेच तो व्यायाम बंद करा.
- कोणत्याही कंपनीचे प्रोटीन शेक किंवा एनर्जी ड्रिंक सेवन करण्याआधी तज्ज्ञांचा सल्ला घ्या.
- जर आपल्याला एखादे संक्रमण किंवा रोग असेल तर आधीच त्याची माहिती जिम ट्रेनरला द्या.

# नंदुरबार डोळ्यात अंजन घालणारं वास्तव!

## बाण, बांबू आणि ब्लेडने करतात प्रसूती... हो हे घडतंय आपल्या महाराष्ट्रात!



■ **बातमी /लेख, प्रीती दिपक नाईक**

राज्यातील गरोदर माता, अर्भक व नवजात बालकांच्या मृत्यूचा दर कमी व्हावा म्हणून शासनाकडून कोट्यावधी रुपयांचा निधी खर्च केला जात आहे. मात्र, दुर्गम भागांमध्ये आजही शासनाच्या योजना पोहोचल्या नसल्याचे भीषण वास्तव नंदुरबार मधून समोर आले आहे. नंदुरबारच्या धडगाव, अक्कलकुवा यांसारख्या दुर्गम भागांमध्ये आजही बाण, बांबू आणि ब्लेडच्या सहाय्याने महिलांची प्रसूती केली जात असल्याचा धक्कादायक प्रकार समोर आलाय.

दरम्यान शासनाकडून जवळपास ७७१ कोटी रुपयांचा निधी गरोदर माता व नवजात बालकांसाठी असलेल्या योजनांसाठी गेल्या दीड वर्षांमध्ये खर्च करण्यात आलाय. स्वातंत्र्य भारताला देखील ७५ वर्ष उलटलीत मात्र, तरीही नंदुरबारसारख्या अतिदुर्गम भागात शासनाच्या योजना पोहोचत नसल्याचं या प्रकारांवरून अधोरेखित होत आहे. त्यामुळे आता तरी संबंधित विभागांनी याकडे गांभीर्यपूर्वक लक्ष देऊन उपाय योजना करण्याची खरी गरज आहे. सातत्याने प्रसारित होत असलेल्या बातम्यांची दखल घेत शासन, प्रशासन आता तरी यावर उपाययोजना करणार का हे बघणं महत्त्वाचं ठरेल.

**स्वातंत्र्याच्या ७५ वर्षांनंतरही हे घडतंय, या घटनेने तुमच्याही अंगावर येईल काटा**

देशाला स्वातंत्र्य मिळून सात दशकांपेक्षा अधिक काळ उलटला आहे. या जवळपास ७५ वर्षांच्या स्वतंत्र भारताने मोठ्या प्रमाणावर प्रगती केली. यामध्ये शासनाने देखील विविध कल्याणकारी योजना राबवत यांना दिलासा देण्याचा प्रयत्न केला मात्र, नंदुरबारसारख्या अतिदुर्गम भागात आजही शासनाच्या योजना पोहोचल्या नसल्याच वारंवार अधोरेखित होत आहे. असाच एक धक्कादायक प्रकार पुन्हा एकदा समोर आला आहे. नंदुरबारच्या अक्कलकुवा, धडगाव या भागामध्ये आजही पुरुष दाईंकडून महिलांची प्रसूती केली जाते. यातील धक्कादायक बाब म्हणजे बाण, बांबू आणि शेविंग ब्लेड यांसारख्या वस्तूंचा प्रसूतीसाठी केला जातोय. आणि त्याची कोणत्याही प्रकारच्या शासकीय कागदावर नोंद केली जात नसल्याची माहिती स्थानिक नागरिकांकडून देण्यात आली आहे. तर दुसरीकडे आरोग्य विभाग आपल्या कार्यक्षेत्रात होणाऱ्या प्रत्येक जन्म आणि मृत्यूची नोंद सक्षमपणे आणि नियमितपणे करत असल्याचा दावा जिल्हा आरोग्य अधिकारी यांच्याकडून करण्यात आला असून चालत आलेल्या जुन्या चालीरीतींमुळे काही ठिकाणी पुरुष दायांच्या मदतीने प्रसूती केली जात असल्याचे त्यांच्याकडून सांगण्यात आलं आहे.

# वसई-विरार पालिका साकारणार भव्य संविधान पार्क

■**विरार। प्रतिनिधी,**

भारतीय राज्य घटनेचे शिल्पकार डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या कायार्चा गौरव करण्यासाठी वसईतील भुईगाव येथे भव्य संविधान पार्क तयार केले जाणार आहे. डॉ. आंबेडकरांचे कार्य, संविधानाची इत्यंभूत माहिती, उद्यान, म्पी थिएटर असे या संविधान पार्कचे स्वरूप आहे. त्यासाठी १० कोटींचा खचार्ला मंजूर देण्यात आली असून पुढील ६ महिन्यात हे काम पूर्ण केले जाणार आहे. डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी दिलेले योगदान आणि त्यांच्या कायार्चा गौरव करण्याचे वसई-विरार महापालिकेने ठरवले आहे. त्यासाठी वसई पश्चिमेच्या भुईगाव येथील पालिकेच्या राखीव भूखंडावर हे संविधान पार्क तयार केले जाणार आहे. या कामाच्या प्राथमिक १० कोटी रुपयांच्या खचार्ला आयुक्तांनी मान्यता दिली



आहे.

हे संविधान पार्क तयार करण्यासाठी तज्ञांची समिती स्थापन करण्यात आली आहे. याबाबत माहिती देताना पालिका आयुक्त मनोजकुमार सुर्यवंशी यांनी सांगितले की, या संविधान पार्क मध्ये संविधान तसेच बाबासाहेब आंबेडकरांच्या कायार्ची इत्यंभूत माहिती आकर्षक पध्दीने देण्यात येणार आहे. याशिवाय ॲम्पी थिएटर, उद्यान, सभागृह आदींचा समावेश असणार आहे. पुढील ६ महिन्यांत ते पूर्ण करण्याचा प्रयत्न असल्याचेही आयुक्तांनी सांगितले. शाळा, महाविद्यालीन विद्यार्थी तसेच पर्यटकांसाठी हे संविधान पार्क आकर्षण ठरणार आहे.

# मिरा-भाईंदरमध्ये एक दिशा मार्गिका लागू

■**भाईंदर। प्रतिनिधी,**

मुंबई-अहमदाबाद महामार्गावर होणारी वाहतूक कोंडी कमी करण्यासाठी मिरा-भाईंदर शहरातील अंतर्गत मार्गावर पोलीस प्रशासनाकडून वाहतुकीत बदल करण्यात आले आहेत. काशिमिरा रस्ता वगळता इतर सर्व पर्यायी रस्ते मुंबईहून येण्यासाठी एकमार्गिका रस्ते म्हणून घोषित करण्यात आले आहेत. वाहतुकीतील हे बदल १५ डिसेंबरपासून प्रायोगिक तत्वावर लागू करण्यात येणार आहेत. मिरा-भाईंदर, वसई-विरार पोलीस आयुक्तालयाकडून शहरातील काशिमीरा भागातील वाहतुकीच्या मुख्य रस्त्यावर प्रायोगिक तत्त्वावर एकदिशा मार्गिका लागू करण्यात येणार आहे. हे बदल १५ डिसेंबर ते २० डिसेंबर दरम्यान संध्याकाळी ६ ते रात्री १० वाजेपर्यंत लागू असणार आहेत. यामुळे या मार्गांवरून आता मुंबईच्या दिशेला वाहनांना जाता येणार नाही. मुंबईकडे जाण्यासाठी केवळ काशिमिरा या मुख्य रस्त्याचा वापर करण्याचे आवाहन पोलिस प्रशासनाने केले आहे.

**प्रवेश बंद मार्गे**

- भक्ति वेदांत हॉस्पिटल ते पेणकरपाडा मार्गे
- दालमिया कॉलेज कॉर्नर ते पेणकरपाडा मार्गे
- भोईर सीएनजी पंपासमोरून पांडुरंग वाडी मार्गे पेणकरपाडा रोडवरून दहिसर चेक नाका पोलिस चौकी मागील प्रवेश
- अजित पॅलेस हॉटेलकडून नॉर्थ बाऊंड सर्व्हिस रोडवर उजव्या वळणासाठी प्रवेश
- लोढा कॉम्प्लेक्स (पांडुरंग वाडी सिग्नलजवळ) येथून महामार्गावर उजव्या वळणासाठी प्रवेश
- मिरा गावठाणातील डेल्टा गार्डन बिल्डिंगजवळून महामार्गावर उजव्या वळणासाठी प्रवेश

**पयार्यी मार्ग :**

- सर्व बंद मार्गावरील वाहने अमर पॅलेस हॉटेल समोरील ब्रिजखालील वळणावरून यु-टर्न घेऊन मुंबई दिशेने पुढे जावीत.

# कचरा खासगीकरणाची फेरनिविदा की वाटाघाटी?

## अंदाजित दरापेक्षा ३९ ते ६३ टक्के अधिक दराने लावली कंपन्यांनी बोली

■**मुंबई। प्रतिनिधी,**

मुंबई महापालिकेच्यावतीने कचरा उचलून वाहून नेण्यासाठी वाहन आणि मनुष्यबळ पुरवण्याकरता २१ विभागांमधील कचरा कंत्राट कामांचे खासगीकरण करण्यासाठी मागील २१ नोव्हेंबर रोजी निविदा खुल्या करण्यात आल्या. या निविदेमध्ये अंदाजित दरापेक्षा ३९ ते ६३टक्के अधिक दराने बोली लावून कंपन्या लघुत्तम ठरल्या आहेत. त्यामुळे परंतु या निविदेमधील या बोलीची रक्कम पाहता घनकचरा व्यवस्थापनाने या फेरनिविदा मागवण्याचे मत मांडले आहे. त्यामुळे निविदा खुल्या झाल्यानंतरही वाटाघाटी करून दर कमी करावा कि फेरनिविदा मागवायच्या या कैचीत महापालिका प्रशासनाचे अधिकारी फसल्याचे दिसून येत आहे.

मुंबई महापालिकेच्यावतीने २४ विभाग कार्यालयांपैंकी तीन विभागांमध्ये महापालिकेचे कामगार आणि वाहनांद्वारे कचरा उचलून वाहून नेला जाणार आहे, तर



उर्वरीत विभागांमध्ये वाहनांसह मनुष्यबळ पुरवण्यास कचरा उचलून नेण्यासाठी निविदा मागवली होती. या निविदा आठ गटांमध्ये विभागून काढण्यात आल्या होत्या. या निविदा प्रथमचपासून वादात अडकलेल्या होत्या, परंतु कामगार संघटनांचे मन वळवल्यानंतर तसेच त्यांच्या मागण्या मान्य केल्याने त्यांच्याकडून हिरवा दाखवल्यानंतर प्रत्यक्षात निविदा प्रक्रिया पुढे राबवण्यात आली.

याबाबत अनेकांच्या तक्रारी आल्याने याबाबत महापालिका प्रशासनाकडून अर्थतज्ज्ञ असलेल्या संस्थांकडून अभिप्राय मागवण्यात आले, त्यानंतर सकारात्मक पाऊल पुढे टाकत प्रशासनाने २१ नोव्हेंबर २०२५ रोजी अखेर ही निविदा खुली केली. या निविदेमध्ये बोलीदार कंपन्यांनी महापालिकेच्या अंदाजित दरापेक्षा ३९ ते सुमारे ६४ टक्के अधिक दराने बोली बोली लावल्याने घनकचरा व्यवस्थापन विभागाच्या प्रमुख अभियंत्यांनी यावर आपले अभिप्राय स्पष्ट केले.त्यात त्यांनी फेरनिविदेची शिफारस केल्याची माहिती मिळत आहे. त्यामुळे २१ नोव्हेंबर २०२५ रोजी निविदा खुल्या झाल्यानंतर महापालिका आयुक्तांना यावर आपला निर्णय घेणे कठिण झाल्याचे दिसून येत आहे. त्यामुळे महापालिका आयुक्त आता वाटाघाटीची भूमिका घेतात यावर सर्वांचे लक्ष आहे, जर वाटाघाटीमध्ये दर कमी न केल्यास फेरनिविदा करण्याशिवाय पर्याय उरत नाही. त्यामुळे ही निविदा पुन्हा एकदा वेगळ्या वळणावर येवून उभी असल्याचे दिसून येत आहे.

# सेंट्रल रेल्वेच्या 'या' स्थानकावर प्लॅटफॉर्मचा विस्तार होणार!

## आता, १५ डब्यांच्या लोकल ट्रेनमध्ये वाढ...

■**मुंबई। प्रतिनिधी,**

मुंबईतील रेल्वे प्रवाशांसाठी आनंदाची बातमी समोर आली आहे. सेंट्रल रेल्वे (मध्य रेल्वे) च्या छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस वरील प्लॅटफॉर्म 5 आणि 6 च्या विस्ताराचं काम अखेर सुरू होणार असल्याचं सांगितलं जात आहे. मध्य रेल्वे प्रशासनाने बोरिवली टोकाकडे असलेली सुमारे ४० वर्षे जुनी जीर्ण सिग्नल इमारत पाडण्याची प्रक्रिया सुरू केली आहे.

बोरिवलीतील ही इमारत बऱ्याच काळापासून वापरात नव्हती आणि छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस स्थानकाच्या प्लॅटफॉर्म विस्तारात एक मोठा अडथळा होती. संबंधित इमारत पाडून टाकल्यानंतर,



स्थानकांवरील पायाभूत सुविधांचं काम लवकर सुरू होऊ शकतं. सेंट्रल रेल्वेकडून छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस स्थानकावरील दोन प्लॅटफॉर्म्सच्या विस्ताराचं काम बऱ्याच काळापासून सुरू होतं.

प्लॅटफॉर्म ५ आणि ६ च्या विस्तारामुळे दोन्ही प्लॅटफॉर्मवर १५ डब्यांच्या लोकल ट्रेन चालवण्यास परवानगी मिळेल. सध्या, प्लॅटफॉर्म ७ हा सीएसएमटी (छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस) वरील एकमेव प्लॅटफॉर्म आहे ज्यावरून, १५ डब्यांच्या लोकल ट्रेन धावतात. प्रवाशांची वाढती संख्या आणि गर्दी लक्षात घेता, सेंट्रल रेल्वे सीएसएमटीवरील दोन अतिरिक्त प्लॅटफॉर्म १५ डब्यांच्या लोकल ट्रेनसाठी योग्य बनवण्याच्या योजनेवर बऱ्याच काळापासून काम करत होती.

**स्थानकावरील वर्दळीच्या दृष्टीने महत्त्वाचं पाऊल**

प्लॅटफॉर्मच्या या नवीन विस्तारामुळे रेल्वेची क्षमता वाढेल आणि गर्दीच्या वेळी प्रवाशांची गर्दी कमी होणार असल्याचं सांगितलं जात आहे. उपनगरीय नेटवर्कची सुरक्षितता वाढवण्यासाठी आणि भविष्यातील वाढत्या ट्रॅफिकचं मॅनेजमेंट करण्याच्या दृष्टीने हे पाऊल महत्त्वाचं मानलं जात आहे. छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस (सीएसएमटी) हे मुंबईतील सर्वात वर्दळीचं रेल्वे स्थानक आहे. दोन्ही प्लॅटफॉर्मच्या विस्तारामुळे लाखो प्रवाशांना चांगला फायदा होणार असल्याची अपेक्षा आहे.

## कौटुंबिक वादातून संतापलेल्या दीराने ३ वर्षीय पुतणीचा गळा चिरला

# पुतण्याला दुसऱ्या मजल्यावरुन फेकलं जागीच मृत्यू

■**भाईंदर। प्रतिनिधी,**

उत्तर प्रदेशातील बिजनौर जिल्ह्यातील एक हृदय पिळवटून टाकणारी घटना समोर आली आहे. कौटुंबिक वादातून संतापलेल्या दीराने स्वतःच्या पुतणीचा गळा चिरून खून केला, तर पुतण्याला घराच्या दुसऱ्या मजल्यावरुन खाली फेकून दिलं. तीन वर्षांची पुतणीचा जागीच मृत्यू झाला असून पाच वर्षांचा मयंक हा गंभीर जखमी झाला असून त्याच्यावर उपचार सुरु आहेत.

ही घटना मंडावली पोलिस ठाण्याच्या हद्दीत येणाऱ्या राजपूर नवादा गावातील आहे. येथे जयपाल सिंह हे सार्वजनिक बांधकाम विभागात कर्मचारी म्हणून कार्यरत आहेत. त्यांचे दोन मुलं, अरुण व हिमांशू, कुटुंबासह राहतात. हिमांशू हा दारूच्या व्यसनामुळे घरात नेहमी वाद-विवाद घडवत असे. गुरुवारीही तो मद्यप्राशन करून आला आणि नेहमीप्रमाणे भाऊ अरुण व वहिनी मंजू यांच्यावर शिवीगाळ करण्यास सुरुवात केली. वहिनीने विरोध केला असता त्याचा संताप अनावर झाला. याच रागात हिमांशू थेट घराच्या दुसऱ्या मजल्यावर गेला. तिथे खेळत असलेल्या तीन वर्षांच्या मानवीचा धारदार वस्तूने गळा चिरून खून केला. त्यानंतर पाच वर्षांच्या मयंकला उचलून दोन मजल्यावरून खाली फेकून दिलं.

**गंभीर जखमी झालेल्या मयंकचा उपचार सुरू**

मयंकच्या ओरडण्याचा आवाज ऐकताच त्याची आई मंजू आणि वडील अरुण धावत गेले. त्यांनी तातडीने त्याला रुग्णालयात दाखल केले. प्रकृती गंभीर असल्याने त्याला पुढील उपचारांसाठी मोठ्या रुग्णालयात हलवण्यात आले आहे. घटनेनंतर हिमांशू घरातून पसार झाला होता. कुटुंबीयांनी त्याच्याविरुद्ध खून व खुनाच्या प्रयत्नाचा गुन्हा नोंदवला.

**जमिनीच्या वादातून थरारक कृत्य**

स्थानिकांच्या माहितीनुसार, हिमांशूला वाटत होते की त्याच्या दारूच्या व्यसनामुळे वडील त्यांची जमीन मोठा मुलगा अरुणच्या नावावर करतील. त्यामुळे तो अनेक महिन्यांपासून जमीन स्वतःच्या नावावर करण्याचा हट्ट धरून होता. याच कारणातून तो सतत घरात गोंधळ घालत असे.

**आरोपी दीराला पोलिसांकडून अटकेत :** बिजनौरचे अप्पर पोलिस अधीक्षक डॉ. कृष्ण गोपाल सिंह यांनी सांगितले की, प्राथमिक तपासात हा प्रकार जमिनीच्या कौटुंबिक वादातून झाल्याचे स्पष्ट झाले आहे. हिमांशूने पुतणीवर प्राणघातक हल्ला करून तिचा खून केला, तर पुतण्यालाही गंभीर जखमी केले. फरार आरोपीला पोलिसांनी अटक केली असून पुढील कारवाई सुरू आहे.




## 'आई माझ्यासोबत....' मुलाचं ऐकताचं हादरली माऊली

# पुण्यात अल्पवयीन मुलावर पियानो क्लासमध्ये...

■**पुणे। प्रतिनिधी,**

पुण्यातून एक गंभीर आणि तितकीच धक्कादायक घटना समोर आली आहे. पुणे शहर, जे शिक्षणाचे माहेरघर म्हणून प्रचंड लोकप्रिय आहे. तसेच शिक्षण घेणाऱ्या मुलांसाठी जिथे सुरक्षित वातावरण मिळते, त्याचं पुण्यात आता एक धक्कादायक घटना घडली आहे. विमाननगरसारख्या प्रतिष्ठित भागात असलेल्या एका पियानो अकादमीमध्ये शिकणाऱ्या एका अल्पवयीन मुलावर तेथीलच एका सफाई कर्मचाऱ्याने लैंगिक अत्याचार केल्याचा गंभीर प्रकार उघडकीस आला आहे. या घटनेमुळे परिसरात मोठी खळबळ उडाली आहे.

विमानतळ पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, ही घटना ८ डिसेंबर २०२५ रोजी सायंकाळी साडेपाच ते साडेसहा वाजण्याच्या दरम्यान घडली. पीडित मुलगा विमाननगर येथील एका प्रसिद्ध पियानो अकादमीमध्ये शिकतो. घटनेच्या दिवशी त्याचा नियमित क्लास नव्हता, पण तो सरावासाठी अकादमीत गेला होता. मुलगा एकटाच सराव करत असताना, अनिल नावाच्या सफाई कामगाराने संधी साधली. त्याने मुलाला पकडले आणि त्याच्यासोबत जबरदस्तीने अश्लील चाळे करत लैंगिक छळ केला.

अगदी आयुष्याच्या कोमल टप्प्यावर व शिकण्याच्या वयात अशा भयानक अनुभवाला सामोरे जावे लागल्याने मुलगा प्रचंड घाबरला. अकादमीतून घरी परतल्यावर, घाबरलेल्या मुलाने रडत रडत आपल्या आईला सर्व घडलेला प्रकार सांगितला. आपल्या मुलासोबत घडलेला हा संतापजनक प्रकार ऐकून आईला मोठा धक्काच बसला. त्यांनी अजिबात वेळ न घालवता थेट विमानतळ पोलीस ठाण्यात धाव घेतली आणि आरोपी अनिल विरोधात तक्रार दाखल केली. पोलिसांनी आरोपीविरुद्ध गुन्हा नोंदवला असून, सहायक पोलीस निरीक्षक करपे या प्रकरणाचा कसून तपास करत आहेत.

या घटनेमुळे पालकांमध्ये भीतीचे वातावरण पसरले आहे. मुलांच्या सुरक्षिततेचा प्रश्न पुन्हा एकदा ऐरणीवर आला आहे. अशा घटना पुन्हा घडू नयेत यासाठी कठोर उपाययोजना करण्याची मागणी जोर धरू लागली आहे. अकादमी व्यवस्थापनाची जबाबदारी आणि कर्मचाऱ्यांची पार्श्वभूमी तपासण्याची गरजही व्यक्त केली जात आहे. पोलिसांनी तातडीने कारवाई करत आरोपीविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे पण या घटनेचे पडसाद समाजात उमटत आहेत.

# अल्पवयीन तरुणीला जाळ्यात ओढलं

## नंतर बलात्कार अन् अश्लील व्हिडीओ बनवून ब्लॅकमेल!

■**ठाणे। प्रतिनिधी,**

राजस्थानमधील चुरू जिल्ह्यातून एक संतापजनक घटना समोर आली आहे. एका 17 वर्षीय अल्पवयीन पीडितेवर बलात्कार केल्याप्रकरणी पोलिसांनी आरोपीला अटक केल्याचं वृत्त आहे. आरोपीने तरुणीला फसवून तिचे अश्लील व्हिडीओ बनवले आणि ते व्हिडीओ व्हायरल करण्याची धमकी देऊन आरोपीने तिच्याकडून पैसे उकळण्याचा प्रयत्न केला. या घटनेने संपूर्ण परिसरात खळबळ उडाली आहे.

**फूस लावून पीडितेला जाळ्यात ओढलं अन्...**

प्रकरणातील पीडिता ही १२ वी इयत्तेत शिकत असून आरोपी इरफान ती शाळेत जात असताना आणि तिथून घरी परतत असताना तिला त्रास द्यायचा. पीडितेच्या कुटुंबियांना सुद्धा याबद्दल कळलं होतं आणि म्हणूनच मुलीची अस्वस्थता पाहून त्यांनी तिची शाळा देखील बदलली, परंतु इरफानने त्याचं घृणास्पद कृत्य करणं थांबवलं नाही. अखेर, आरोपीने गोड बोलून आणि फूस लावून पीडित विद्यार्थ्यार्ला आपल्या जाळ्यात ओढलं आणि दररोज तिच्याशी संपर्क ठेवू लागला. संदीप नावाच्या एका दुसऱ्या एका तरुणाने इरफानला या प्रकरणात मदत केली. तो पीडितेबाबत दररोज आरोपीला अपडेट्स देत असायचा.

**बलात्कार अन् अश्लील फोटो दाखवून ब्लॅकमेल**

एके दिवशी, इरफान त्या पीडित तरुणीला एका घरात घेऊन गेला. तिथे त्याने बळजबरीने तिच्यावर बलात्कार केला आणि दरम्यान तिचे अश्लील फोटो तसेच व्हिडिओ काढले. त्यानंतर तो तिला त्या फोटो आणि व्हिडीओच्या आधारे ब्लॅकमेल करू लागला. इतकेच नव्हे तर, त्याने त्या बदल्यात पीडितेकडून पैसे देखील मागितले होते. त्याच्या भितीमुळे पीडिता बराच काळ गप्प राहिली आणि तिच्यासोबत घडलेल्या घटनेबद्दल तिने कोणालाच काहीही सांगितलं नाही. पण, कुटुंबियांना तिच्या वागण्यावरून संशय आला.

**आरोपीविरुद्ध गुन्हा दाखल**

अखेर, कुटुंबियांनी पीडितेची विचारपूस केल्यानंतर तिने तिच्यासोबत घडलेल्या भयानक प्रकाराबद्दल सांगितलं. त्यानंतर, मुलीच्या वडिलांनी आरोपीच्या कुटुंबियांना देखील तरुणाच्या घृणास्पद कृत्याबाबत सांगितलं आणि त्याला समज देण्यास देखील सांगितलं. पण, तरीही इरफानने त्याचं ते कृत्य सुरूच ठेवलं. शेवटी, १९ नोव्हेंबर रोजी इरफानविरुद्ध पोलीस स्टेशनमध्ये गुन्हा दाखल करण्यात आला.

**आरोपी तरुणाला पोलिसांकडून अटक**

पोलिसांच्या माहितीनुसार, आरोपी तरुण पीडित विद्यार्थिनीला सतत त्रास देत होता आणि तिला तिच्या अश्लील फोटो तसेच व्हिडीओच्या आधारे ब्लॅकमेल करून तिच्याकडून पैसे उकळण्याचा प्रयत्न करत होता. पोलिसांनी यासंबंधी पुरावे गोळा केले आणि आरोपीला अटक करण्यात आली. अटकेनंतर पोलिसांनी आरोपी इरफानला गुरुवारी चुरू येथील पोक्सो न्यायालयात हजर केलं. न्यायालयाने त्याला पोलीस कोठडी सुनावली. या प्रकरणामुळे अल्पवयीन मुलींची सुरक्षिततेवर पुन्हा प्रश्नचिन्ह उपस्थित झालं आहे.

# 'तुला घरी सोडतो' म्हणत उमेश आणि रॉकीची घाणेरडी करतूत, निर्जनस्थळी नेत तरुणीवर अत्याचार

■**नाशिक। प्रतिनिधी,**

घरी सोडण्याच्या बहाण्याने एका तरुणीला गुंगीकारक शीतपेय पाजून तिच्यावर निर्जनस्थळी बलात्कार करणाऱ्या तरुणासह त्याच्या मित्राविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. तरुणी ही अशोका मार्ग सिग्नलजवळ उभी असताना त्या ठिकाणीत दोघा जणांनी येऊन तिला घरी सोडण्याच्या बहाण्याने गाडीवर बसवून तपोवन येथे निर्जनस्थळी घेऊन जात बलात्कार करण्यात आला गुंगीकारक शीतपेय पाजून त्यानंतर हे कृत्य केल्याचे तरुणीने दिलेल्या फियार्दीत म्हटले आहे.

अशोका मार्ग येथे ही तरुणी उभी असताना उमेश नावाचा संशयित तरुण तेथे आला. त्याने "दीदी, चल, तुला घरी सोडतो," असे सांगून त्याचा मित्र रॉकी चालवीत असलेल्या एमएच १५ जीपी २७६७ या क्रमांकाच्या पांढऱ्या रंगाच्या ॲक्टिव्हा मोपेडवर पीडितेला बळजबरीने बसविले. त्यानंतर संशयित आरोपी उमेश याने त्याच्या हातातील गुंगीकारक शीतपेय पीडितेला पिण्यास दिले. ते शीतपेय प्याल्यानंतर पीडितेला नशा झाली.

त्या नशेमध्ये आरोपी उमेश याने पीडितेला तपोवन येथे निर्जनस्थरस्थळी नेऊन तिच्यावर बळजबरीने बलात्कार केला व या कामात त्याचा मित्र रॉकी याने उमेशला मदत केली. ही पीडिता सकाळी शुद्धीवर आल्यानंतर बलात्कार झाल्याची बाब तिच्या लक्षात आली. हा प्रकार दि.१० डिसेंबर रोजी रात्री साडेअकरा ते दि. ११ डिसेंबर रोजी सकाळी ८ वाजेच्या दरम्यान तपोवनातील निर्जनस्थळी घडला. तर या प्रकरणी मुंबई नाका पोलीस ठाण्यात संशयित उमेश व रॉकी यांच्याविरुद्ध बलात्काराचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे.



**हातात शस्त्र मिरवत एकाकडून दहशत माजवण्याचा प्रयत्न**

नाशिकच्या वणी (ता. दिंडोरी) इथल्या जगदंबा देवी मंदिर परिसरात नशेत धारदार शस्त्रे हातात घेऊन एकाकडून दहशत माजवण्याचा प्रयत्न करण्यात आला.हा संपूर्ण प्रकार येथील उउळश कॅमेरात कैद ९छ आहे. ८ ते १० युवकांनी मंदिर परिसरात आरडाओरडा, शिवीगाळ करत उच्छाद माजवला.दि.१२ डिसेंबर रोजी रात्री साडे नऊ वाजेच्या सुमारास हा संपूर्ण प्रकार घडला. या संदर्भात श्री. सप्तश्रृंग देवी ट्रस्टच्या अध्यक्ष राजेंद्र थोरात आणि आदींनी पोलिसांकडे याबाबत तक्रार अर्ज दाखल केल्यानंतर वणी पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.घटनेची माहिती घेत पोलिसांनी एकाला ताब्यात घेत गुन्हेगारी प्रवृत्तीला आळा बसावा म्हणून संशयित आरोपीची धिंड काढून शहरभर फिरवले. पोलिस ठाण्यातून सुरुवात करून मुख्य रस्ते, बाजारपेठ ते जगदंबा मंदिर अशी धिंड या संशयिताची काढण्यात आली.

हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक व संपादक - डॉ. श्री. दिपक मोरेश्वर नाईक यांनी सोमाणी प्रिंटींग प्रेस, कार्यालय - गाला नं. ४, एन. के. इंडस्ट्रीयल इस्टेट, प्रवासी इंडस्ट्रीयल इस्टेटच्या बाजुला, गेट नं. २, गोरेगाव (पुर्व) मुंबई ४०००६३ (महाराष्ट्र) , येथे छापून रुम नं. १०३, कुणाल कुटीर बी बिल्डींग, नवघर रोड, हनुमान मदिराजवळ, भाईंदर (पुर्व), जि. ठाणे ४०११०५ (महाराष्ट्र) येथे प्रसिद्ध केले. संपादक - डॉ. श्री. दिपक मोरेश्वर नाईक, पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जवाबदारी यांची राहील, सर्व वाद आणि दावे ठाणे न्यायालयीन कक्षेच्या आधील राहतील. (या वर्तमानपत्रात प्रसिद्ध होणाऱ्या बातम्या /लेख / जाहिराती यांची जवाबदारी संबधीत वार्ताहर, लेखक, आणि जाहिरात प्रतिनिधी याच्यावर राहील.) भ्रमणध्वनी - ७४००००१४७४. Email : marathiekikaran2021 @gmail.com

Printed , Published and Owned by **Dr. Mr. Deepak Moreshwar Naik**. Printed at **SOMANI PRINTING PRESS**, OFFICE - Gala No. 4, Near N.K. Industrial Estate, Near Pravasi IndustrialEstate, Gate No.2, Goregaon (E), Mumbai 400 063, Maharashtra, Published at Room No. 103, Kunal Kutir, B Building , Navghar Road, Near Hanuman Mandir, Bhayander (East ) Dist - Thane, PinCode 401 105, Maharashtra. Editor : Dr. Mr. Deepak Moreshwar Naik, Mo.7400001474, Email Id : marathiekikaran2021@gmail.com